# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८ / आषाढ २०, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९७**

---

### राज्यात स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान मंत्रालय निर्माण करण्याबाबत

**(१) * ४१२३१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर आणि नागपूर येथे आयटी पार्क स्थापन केले असून महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सॉफ्टवेअर निर्यात करणारे राज्य असून येथे स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान मंत्रालय नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान मंत्रालय नसण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान मंत्रालय निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही, अशी बाब निर्दशनास आलेली नाही.
(२) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, माहिती तंत्रज्ञान संचालनालयात समाविष्ट करुन स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान विभाग निर्माण करण्याचे प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील भिमा-कोरेगाव येथे मुलीची हत्या झाल्याबाबत

**(२) * ४२०३२ अॅड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील भिमा-कोरेगाव येथे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या दंगलीमध्ये श्री.सुरेश सकट यांच्या घराच्या झालेल्या नुकसानीची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेली श्री.सकट यांची मुलगी कु.पुजा सकट हिची हत्या करुन तिचा मृतदेह तिच्या घराजवळील विहिरीत टाकल्याचा निष्कर्ष सत्यशोधत समितीने आपल्या अहवालात दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार आतापर्यंत किती आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त गुन्ह्याच्या तपासाची सद्य:स्थिती काय आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी मयताच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरुन शिक्रापूर पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. २२९/२०१८ भा.दं.वि. कलम ३०६, ३४ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१५ चे कलम ३(२)(५) अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण ९ आरोपीपैकी २ आरोपींना अटक करण्यात आली असून, ते न्यायालयीन कोठडीमध्ये असल्याने त्यांना जामिन मंजूर करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील भीमा-कोरेगाव येथे झालेल्या दंगलीची चौकशी करण्याबाबत

**(३) * ४१६४६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील भीमा-कोरेगाव येथे विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या जनसमुदायावर दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास काही समाजकंटकांनी आक्रमकरित्या हल्ला केल्यामुळे घडलेल्या दंगलीची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त दंगलीची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात कोणत्या बाबी स्पष्ट झालेल्या आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच संभाजी महाराज यांचे वडू येथील स्मारक, भीमा-कोरेगाव येथील विजयस्तंभ परिसराचा विकास व परिसरातील जागेचा प्रश्न इत्यादींबाबत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०९/०२/२०१८ रोजीच्या अधिसूचने अन्वये कोरेगांव-भिमा येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने व्दिसदस्यीय न्यायालयीन चौकशी आयोगाचे गठन करण्यात आलेले असून मा.आयोगाकडून चौकशी सुरु आहे.

(३) वडू येथील स्मारक राज्य संरक्षक स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर समाधीचे क्षेत्र संरक्षित असून समाधीची वास्तू सुस्थितीत असल्याने विकासाची कामे प्रस्तावित केली नाहीत. तसेच बाहेरील जागा सहायक संचालक, पुरातत्व विभागाचे अखत्यारीत नसलेबाबत पुरातत्व विभाग, नाशिक यांनी कळविले आहे. मा.दिवाणी न्यायालयाने विजयस्तंभ

असलेली जमीन क्षेत्रामधील अतिक्रमण काढणेबाबत कार्यवाहीस तात्पुरती स्थगिती देण्याबाबतची मागणी फेटाळली आहे. सदर प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. मा.उपविभागीय अधिकारी, हवेली यांचे आदेशानुसार ७/१२ कब्जेदार सदरी असलेले वहिवाटदारांची नावे कमी करणेत आलेली आहेत व मौजे पेरणे, ता.हवेली, जि.पुणे येथील गट क्र. १०३३ मधील क्षेत्र ३.८६ हेक्टर आर एवढे विजयस्तंभ या नावे करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. मधील कामगारांची देणी देण्याबाबत

**(४) * ४१३८० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. कंपनीतील ३००० कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्यासंदर्भात मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.कामगार मंत्री व अधिकारी यांच्यासमवेत दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्टनुसार कार्यवाही सुरु करण्यासाठी शासनाकडून केंद्र शासनाला कळविण्यात येईल असे ठरले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.
(२) या प्रकरणी समुचित शासन केंद्र शासन असल्याने याबाबत उचित कार्यवाही करण्याची विनंती कामगार आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाने दिनांक १४/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपमुख्य श्रम आयुक्त, (केंद्रीय) मुंबई यांना केली आहे.

तसेच, सदर प्रकरणी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० मधील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करण्याची विनंती सचिव (कामगार व रोजगार) भारत सरकार यांना प्रधान सचिव यांचेस्तरावरुन दिनांक २५/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये व मा.मंत्री (कामगार) यांचे स्वाक्षरीने मा.राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार), कामगार व रोजगार मंत्रालय भारत सरकार यांना दिनांक २७/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेंटर उभारण्याबाबत

**(५) * ४१७६१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेंटर उभारण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंतरराष्ट्रीय वित्तीय सेंटर गुजरात मधील अहमदाबाद येथे उभारण्यात येणार असल्याचे मा.केंद्रीय वित्तीय मंत्री महोदयांनी स्पष्ट केल्याने मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये उभारण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून अनुमती न मिळाल्यामुळे मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेंटर उभारण्याबाबतचा प्रश्न ऐरणी आले आल्यामुळे याबाबत शासनाची भुमिका स्पष्ट करुन सदयस्थिती काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये जागतिक वित्तीय सेवा केंद्राच्या विकासाची योजना व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी तसेच केंद्र शासनासोबत समन्वय साधण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ३ डिसेंबर, २०१५ अन्वये केंद्रीय वित्त राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने कार्यदलाची स्थापना केली आहे.

आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जी टेक्स ब्लॉक, बीकेसी येथे ५०.३१ हेक्टर क्षेत्र निश्चित केले आहे. सदर जी टेक्स ब्लॉक, बीकेसी मधील क्षेत्रापैकी ४.२ हेक्टर क्षेत्र तात्पुरते व ०.९ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी दिनांक २६/०२/२०१८ पासून चार वर्षासाठी बुलेट ट्रेनच्या भूमिगत टर्मिनलच्या बांधकामासाठी दिनांक १२/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीवर हायस्पीड रेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांना देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र व बुलेट ट्रेन हे दोन्ही प्रकल्प एकाच ठिकाणी राबविण्याचे प्रयत्न आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये जागतिक वित्तीय सेवा केंद्र उभारण्यासाठी आराखडा व अर्बन डिझाईन मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी मेसर्स टाटा कन्सल्टन्सी इंजिनिअर्स लिमिटेड व मेसर्स टाऊन लॅण्ड कन्सल्टन्ट (हाँगकाँग) यांच्या संयुक्त उपक्रमाची दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी नेमणूक केली असून सल्लागाराकडून सदर प्रकल्पाचा आराखडा लवकरच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर होणे अपेक्षित आहे.

सदर ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्र मान्य करुन त्यावर जागतिक वित्तीय सेवा केंद्र स्थापन करण्यास मंजूरी देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. या संदर्भातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रस्ताव शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक २२/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाकडे औपचारिक मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

-----------------

## मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील भाडे विकासकांनी थकविल्याबाबत

**(६) * ४१६३० श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उपकर प्राप्त इमारती तसेच एसआरए योजना राबविणाऱ्या विकासकांनी रहिवाश्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यासाठी म्हाडाकडून संक्रमण शिबिरातील १५०० घरे भाड्याने घेतली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घरे विकासकांनी म्हाडाला परत केली नसल्याने या घराचे मासिक भाडे आणि थकीत भाडे पोटी विकासकांनी अंदाजे रुपये ११८ कोटी थकविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासकांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव मुख्य अधिकाऱ्यांनी प्रस्ताव फेटाळल्याने भाडे थकविणाऱ्या विकासकांना अभय मिळाल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भाडे थकविणाऱ्या विकासकांवर आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७), ३३ (९) व ३३(१०) अंतर्गत उपकरप्राप्त इमारतीच्या/झोपडपट्टी पुनर्विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त विकासक/ सहकारी संस्था यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरात विविध अटी व शर्तीच्या अनुषंगाने संक्रमण गाळ्यांचे वितरण करण्यात येते.

विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने थकीत रकमेचा भरणा करणेबाबत तसेच थकीत रकमेचा भरणा न केल्यास म्हाड अधिनियम, १९७६ चे कलम ९५ अ (३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करुन संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीसा विकासकांना देण्यात आल्या आहेत. परंतु सदर नोटीशीला विकासकांमार्फत कुठलाही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, विकासक पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीसा (Stop Work Notice) देण्यात आल्या आहेत. तसेच म्हाड अधिनियम, १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशिल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विकासक यांचे जंगम स्थावर मालमत्तेचा तपशिल मागविण्यात आलेला आहे.

तसेच विकासकांना काम थांबविण्याची नोटीस दिल्यानंतर मे, २०१८ अखेर थकित असलेली रक्कम रुपये १२१.२३ कोटीपैकी माहे मे, २०१८ पर्यंत रुपये ७०.०४ कोटी इतकी रक्कम विकासकाकडून वसूल करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या कोकण मंडळाने सन २०१४ व २०१६ मध्ये काढलेल्या लॉटरीतील घरे विजेत्यांनी म्हाडाला परत केल्याबाबत

**(७) * ४२०६५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा कोकण मंडळाच्या सन २०१४ व २०१६ मध्ये करण्यात आलेल्या सुमारे ४ हजार ४०० घरांपैकी १ हजार ९०० घरे म्हाडाला परत केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या घरांच्या वाढीव किंमतीमुळे आणि म्हाडामार्फत प्रक्रिया करण्यास होणाऱ्या दिरंगाईमुळे सदर घरे परत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या १ बीएचकेची किंमत जवळपास रुपये २३ लाख तर मोठ्या घरांची किंमत ४० लाख एवढी असून म्हाडाच्या किंमतीच्या तुलनेत खुल्या बाजारात कमी किंमतीत लोकांना घरे उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गरीब व गरजू लोकांना म्हाडाची घरे कमी किंमतीत उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

म्हाडाने विरार बोळींज गृहप्रकल्पामध्ये एकूण ५४४६ (सन २०१४ व २०१६ मधील) सदनिकांची जाहीरात दिलेली होती. त्यापैकी २४६ अर्जदारांनी स्वत:हून परतावा घेतलेला आहे.

(२) नाही.

(३) विरार बोळींज येथे सध्या बाजारभाव रुपये ८७३०/- ते ८९८६/- प्रति चौ.फुट (चटई क्षेत्रफळावर) इतका आहे व म्हाडाचे दर रुपये ७२१४/- प्रति चौ.फुट (चटई क्षेत्रफळावर) आहे.

तसेच रेडीरेकनरनुसार दर रुपये ४९३३/- प्रति चौ.फुट (बांधकाम क्षेत्रफळावर) व म्हाडाचा दर रुपये ३८०९/- प्रति चौ.फुट (बांधकाम क्षेत्रफळावर) इतका आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एम्प्रेस सिटी व मॉल मधील अनधिकृत बांधकामांमधील त्रुटीमुळे नागपूर महानगरपालिकेने दंड ठोकावल्याबाबत

**(८) * ४२०४६ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०६० ला दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर एम्प्रेस सिटी व मॉल मधील अनधिकृत बांधकामे व बांधकामांमधील त्रुटीमुळे महानगरपालिकेने रुपये १४,५१,३५,५८५/- ची मागणी विकासकाकडे दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकामार्फत सदर रक्कमेपैकी फक्त २ कोटी रुपयांचा भरणा दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी महापालिकेकडे करण्यात आला असून विकासकाने उर्वरित रक्कम महापालिकेत जमा न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच उपरोक्त प्रकरणी महानगरपालिकेने एम्प्रेस सिटी व मॉलच्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व सदरहू रक्कम कधीपर्यंत महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर एम्प्रेस सिटी व मॉलकडे महानगरपालिकेने दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंतच्या मालमत्ता करापोटी रुपये १४,६१,९९,९४५/- इतकी मागणी केली आहे.

तसेच अनधिकृत बांधकाम व बांधकामातील त्रुटी यासाठी दिनांक १२/०४/२०१८ पर्यंत रुपये १९,०२,८५,६३६/- इतक्या रकमेची मागणी विकासकाकडे केली आहे.

(२), (३) व (४) मालमत्ता कराच्या वसुलीसाठी, महानगरपालिकेमार्फत जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात आली होती. सदर कारवाई तसेच अनधिकृत बांधकामासाठी आकारण्यात आलेल्या रकमेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने, विकासकास रुपये दोन कोटी इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे करण्याचे अंतरिम आदेश पारित केले आहेत.

तसेच विकासकाविरुध्द कोणतीही जबारान कारवाई करु नये असे महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत.

प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे, पुढील कार्यवाही मा.उच्च न्यायालयाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशान्वये करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील माझगाव ताडवाडी येथील पुनर्विकास प्रकल्प रद्द करण्यात आल्याबाबत

**(९) * ४१३८९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प गत १३ वर्षापासून प्रलंबित असल्याने सदर प्रकल्प मुंबई महानगरपालिकेने माहे मे, २०१८ च्या प्रथम सप्ताहात रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडवाडी येथील सदर प्रकल्पाकरीता बांधण्यात आलेले संक्रमण शिबिर १३ वर्षात अतिधोकादायक झाल्याने संक्रमण शिबिर कोसळल्यास स्थानिक रहिवाश्यांच्या जिवितास होणाऱ्या हानीची जबाबदारी विकासक किंवा महानगरपालिका प्रशासन घेणार आहे काय,

(३) असल्यास, माहूल (चेंबूर) येथे स्थलांतरित करण्यात आलेल्या इमारत क्रमांक १५ व १६ येथील २२० रहिवाश्यांना ताडवाडी येथेच संक्रमण शिबिर बांधून देऊन सदर प्रकल्प म्हाडा अथवा महापालिकेच्या माध्यमातून तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील माझगांव, ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासासाठी मे. ग्रेस ॲण्ड रबरवाला सिटी डेव्हलपर्स यांना दिनांक १६/०५/२००८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत इरादापत्र देण्यात आले होते.

परंतु सदर विकास प्रकल्पामध्ये विकासकाने लक्षणीय प्रगती न केल्याने इरादापत्र रद्द करण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत दिनांक ०३/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये विकासकास कळविण्यात आले आहे.

(२) सदर पुनर्वसन प्रकल्पाकरीता सन २००५ मध्ये इमारत क्रमांक १२ व सन २०११ मध्ये इमारत क्रमांक १३ए व १३बी अशा तळमजला + ४ स्वरुपाच्या संक्रमण शिबिराच्या ३ इमारती बांधण्यात आल्या होत्या.

इरादापत्र रद्द केल्याचे विकासकास कळविल्यानंतर सदर संक्रमण शिबिराच्या इमारतींचे संरचनात्मक सर्वेक्षण करण्याकरीता दिनांक १९/०६/२०१८ रोजी स्ट्रक्चरल इंजिनियर यांची नियुक्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानुसार दुरुस्ती आवश्यक असल्यास त्यानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) व (४) ताडवाडी येथील अतिधोकादायक इमारत क्रमांक १५ व १६ मधील २२० रहिवाशांना माहूल येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

मे.स्ट्रक्टवेल कन्सल्टंट्स यांनी यापूर्वी सादर केलेल्या संरचनात्मक सर्वेक्षण अहवालानुसार सदर प्रकल्पातील इमारतींची दुरुस्ती करण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु असून दुरुस्तीची कामे सुरु होईपर्यंत इमारतींच्या सुरक्षेकरीता टेकू लावण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

-----------------

## म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) महत्वाच्या नस्त्या आगीत नष्ट झाल्याबाबत

**(१०) * ४२२६९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रसाद लाड, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) १८ हजार महत्वाच्या स्कॅनिंग केलेल्या नस्ती नवी मुंबईतील महापेमधील शील कंपनीच्या ४ नंबरच्या डिपार्टमेंटमध्ये सुरक्षित ठेवण्याकरीता करार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शील कंपनीतील ४ नंबरच्या डिपार्टमेंटमध्ये माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लागलेल्या आगीत नष्ट झालेल्या नस्तीत लाचलुचपत खात्याकडून चौकशी सुरु असलेल्या म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांमधील गैरव्यवहाराच्या नस्तींचाही समावेश असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनीच्या विरोधात शासनाने किंवा म्हाडाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) व (२) म्हाडा व शील प्रोजेक्ट लि. यांच्याशी दिनांक १२/१०/२०१२ रोजी झालेल्या करारनाम्यानुसार म्हाडाच्या ५,३४,४७६ नस्त्या सदरहू शील कंपनीकडे जतन करण्यासाठी ठेवल्या होत्या. त्यापैकी १७,९९० नस्त्या दिनांक १९/१२/२०१७ रोजी लागलेल्या आगीत जळाल्या असून ४,७४९ नस्त्या पाण्याने भिजलेल्या आहेत. तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या नस्त्या सदर कंपनीकडे ठेवण्यात आलेल्या नाहीत.

उक्त सर्व संचिकांची स्कॅन कॉपी सर्व्हर वर उपलब्ध आहे. जळालेल्या व भिजलेल्या नस्त्यांची दुय्यम प्रत शील कंपनीच्या खर्चाने तयार करुन देण्याबाबत कंपनीस कळविण्यात आले असून चार महिन्यात सदरच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे उक्त शील कंपनीने मान्य केले आहे. त्यामुळे ज्या प्रकरणात घोटाळे आणि गैरप्रकार घडलेले आहेत त्याबाबतच्या चौकशीवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही.

(३) व (४) म्हाडा व शील कंपनी यांच्यातील करारनाम्यानुसार म्हाडाकडील संचिका स्वरुपातील व सॉफ्ट कॉपीमध्ये असलेला अभिलेख जतन करण्याची जबाबदारी शील कंपनीकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुषंगाने शील कंपनीस

दिनांक ११/१२/२०१७ रोजी आग लागल्याचे समजताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) येथील पापडखिंड धरण प्रदूषित झाल्यामुळे कायमस्वरुपी बंद करण्यात आल्याबाबत

**(११) * ४१९०६ श्री.आनंद ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील पापडखिंड धरण प्रदूषित झाल्या कारणास्तव बंद करण्याचा निर्णय महापालिकेने घेतल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाजवळून बुलेट ट्रेनचा मार्ग जाणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पापडखिंड धरण बंद केल्याने स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणार असल्यामुळे निर्माण होणारी पाण्याची समस्या लक्षात घेता सदर जलस्त्रोत बंद न करण्याबाबत तेथील जनतेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीची दखल घेवून यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) वसई-विरार (जि.पालघर) येथील पापडखिंड धरण प्रदूषित झाल्या कारणास्तव बंद करण्याचा निर्णय घेतला नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) नाही.

(३) पापडखिंड धरणातून माहे जुलै ते फेब्रुवारीपर्यंत १ द.ल.लि. प्रतीदिन पाणीपुरवठा करण्यात येतो.

यावर्षी दिनांक २६/०६/२०१८ पासून वसई-विरार शहर महानगरपालिकेने उक्त धरणातून पाणीपुरवठा सुरू केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था अनुदानित करणेबाबत

**(१२) * ४१५६८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना कायम विनाअनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली असून सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेपेक्षा जास्त फी विद्यार्थ्यांकडून आकारली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००१ पर्यंतच्या परवानगी मिळालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याचे शासनाचे प्रस्तावित धोरण असून सन २००१ नंतर कायम विनाअनुदानित तत्वावर परवानगी मिळालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनाही अनुदान देण्यासाठी अशा संस्थांचे मुल्यांकन करून अनुदान देण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा कायम विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाव्दारे आकारण्यात येणारी फी ही शासन नियुक्त शुल्क नियंत्रण समितीमार्फत निश्चित करण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २००१ पूर्वीच्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना अनुदान देण्याचे शासनाचे प्रस्तावित धोरण नाही. तथापि, सन २००१ पूर्वीच्या व सन २००१ नंतरच्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची अनुदान मिळण्याबाबतची मागणी केली जात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-ठाणे-कल्याण जल वाहतूक प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(१३) * ४१३२० श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-ठाणे-कल्याण या ५४ कि.मी. लांबीच्या जल वाहतूक मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत असल्याकारणास्तव सदर जल वाहतूक मार्ग पूर्ण करण्याकरीता शासनाने पाठपुरवठा करुन कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) दिनांक २०/०३/२०१८ रोजी ठाणे महानगरपालिकेमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली (IWAI) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाची मान्यता आणि निधी प्राप्त झाल्यानंतर, केंद्र व राज्य शासनाच्या मान्यतेने संयुक्त कंपनी करार करुन सदर जलमार्गाचे काम करणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जामखेड (जि.अहमदगर) येथे राजकीय कार्यकर्त्यांचा खून झाल्याबाबत

**(१४) * ४२४५८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहमदनगर) येथे राकेश उर्फ रॉकी अर्जून रेळेभात व योगेश अंबादास रेळेभात या राजकीय कार्यकर्त्यांचा दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास खून करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्यामागील कारणांचा व गुन्हेगारांचा पोलिसांनी शोध घेवून त्यांना अटक करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशन येथे गुरनं ७५/२०१८ भा.दं.वि. कलम ३०२, १२० (ब), १४३, १४७, १४८, १४९ सह आर्म ॲक्ट ३/२५, २७ अन्वये दिनांक २९/०४/२०१८ रोजी एकुण १४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे व १ विधी संघर्ष बालकास मा.प्रधान न्यायदंडाधिकारी, बाल न्याय मंडळ, अहमदनगर यांचे समक्ष हजर केले आहे. उर्वरीत आरोपींचा शोध घेण्यावर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## दलित आदिवासी संघटनांनी पुकारलेल्या "भारत बंद" ला हिंसक वळण लागून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत

**(१५) * ४१६५३ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने "ॲट्रॉसिटी" कायदयासंदर्भात दिलेल्या निर्णयाविरोधात दलित, आदिवासी संघटनांनी पुकारलेल्या "भारत बंद" ला दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी राज्याच्या अनेक भागात हिंसक वळण लागून सार्वजनिक मालमत्तेचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी समाजकंटकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, खरे आहे. भारत बंद दरम्यान हिंसक वळण लागून सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीच्या सहा घटना घडल्या आहेत. याबाबत चौकशी केली असून सदर घटनेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

१) पोलीस आयुक्त, नवी मुंबई हद्दीतील खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०३/२०१८ अन्वये गुन्हा दाखल असून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर हद्दीतील ८ दखलपात्र गुन्हयात ३८ आरोपींना अटक केली व २ गुन्हयात दोषारोप पत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत ६ गुन्हयाचा तपास अंतिम टप्प्यावर आहे.

३) पोलीस अधीक्षक, जालना हद्दीतील एका गुन्हयामध्ये सदर प्रकरणी ४ अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४) पोलीस अधीक्षक, भंडारा हद्दीतील एका गुन्हयामध्ये अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

५) पोलीस अधीक्षक, जळगाव हद्दीतील एका गुन्हयामध्ये ज्ञात व अज्ञात ७० ते ८० इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

६) पोलीस अधीक्षक, नंदुरबार हद्दीतील शहादा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये २ गुन्हे दाखल असून अज्ञातांचा शोध घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## व्टिंकल एनव्हायरो टेक लि., रॉयल व्टिंकल स्टार क्लब लि. आणि सिट्रस चेक इन्स लि. या कंपन्यांमार्फत गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(१६) * ४२६४२ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्टिंकल एनव्हायरो टेक लि., रॉयल व्टिंकल स्टार क्लब लि. आणि सिट्रस चेक इन्स लि. या कंपन्यांमार्फत गोर-गरीब, सामान्य नोकरदार वर्ग, मोलमजूरी करणाऱ्या स्त्रिया, निवृत्तीधारक अशा ३० लाखापेक्षा जास्त गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाने गुंतवणूकदारांच्या पैशातून विकत घेतलेली संपत्ती विकून परदेशात पैसा वळवून शासनाचा महसूलही बुडविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने दोषींविरूध्द कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) आरोपी ओमप्रकाश गोयंका व संचालक यांनी मिळून जवळपास १८.५ लाख नागरिकांकडून गुंतवणूक स्वीकारली असून सेबीच्या अहवालानुसार ९ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम गोळा केली आहे. यामध्ये गुंतवणूकदारांची मुळ रक्कम रुपये ४,२५६ कोटी परतावा करणे बाकी आहे.

सदर प्रकरणी आरोपी कंपनीविरुध्द राज्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ नुसार फसवणूकीसंदर्भात एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नमूद गुन्ह्यातील आरोपी ओमप्रकाश गोयंका यास अटक केली आहे. आरोपी कंपनी रॉयल व्टिंकल स्टॉर क्लब प्रा.लि. व सिट्रस लि. यांचे संचालकाच्या महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत ४७ स्थावर मालमत्ता संरक्षित करुन त्याबाबतची शासन अधिसूचना दिनांक ३१/०५/२०१८ रोजी राजपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच, आरोपी कंपनी व संचालक यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे.

आरोपी कंपनीच्या योजनेतील गुंतवणूकदारांनी मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल सिव्हील अपील क्र. २०९७१/२०१७ मध्ये दिनांक १०/०५/२०१८ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप अर्ज दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) नगरपालिकेच्या व्यापारी गाळे वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) * ४१६२२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१७३ ला दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) नगरपालिकेच्या व्यापारी गाळे वाटपात गैरव्यवहार झाल्याची तक्रार श्री.मनोहर चाळक यांनी वारंवार केल्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी या प्रकरणात नगरपालिका, गेवराई यांना दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास वारंवार स्मरणपत्रे देऊन चौकशी अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची अद्याप चौकशी करण्यात आलेली नसून श्री.मनोहर चाळक यांनी गेवराई नगरपालिकेतील अनेक आर्थिक गैरव्यवहार आणि अनियमितेबाबत सुध्दा दिलेल्या तक्रारीची दखल प्रशासनाने घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांनी चार आठवड्यात चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर चौकशी अहवालातील निष्कर्ष काय आहेत ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) श्री.मनोहर चाळक यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगरपरिषद गेवराई यांना सदर प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी तहसिलदार, गेवराई यांना चौकशी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, बीड यांनी प्राधिकृत केले आहे.

चौकशी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी अहवाल सादर केला असून त्याची जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर छाननी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागांतर्गत शासनाच्या विविध कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) * ४१२४१ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागांतर्गत शासनाच्या विविध कार्यालयात गत काही वर्षापासून जवळपास २१ हजार ५०० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त पदांचा बॅकलॉग न भरल्यामुळे त्याचा परिणाम जनसामान्यांवर तसेच कार्यालयात कार्यरत असलेल्या अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा वाढीव ताण पडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर विभागातील शासकीय कार्यालयात २१ हजार ५०० पदे रिक्त असल्याचे वृत्त दैनिक लोकमत या वृत्तपत्राच्या नागपूर आवृत्तीमध्ये दिनांक १७/०१/२०१८ रोजी प्रसिध्द झाले होते.

उक्त बातमीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती-जनजाती संघटनांचा अखिल भारतीय परिसंघ, विभागीय कार्यालय, नागपूर या संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २४/०४/२०१८ चे निवेदन विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०८/०६/२०१८ च्या पत्राव्दारे शासनास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) नागपूर विभागातील विविध शासकीय कार्यालयात काही अंशी रिक्त असलेल्या पदांचा विपरित परिणाम जनसामान्यांवर तसेच सेवारत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर न होण्याच्यादृष्टीने नागपूर विभागातील कार्यालयातील रिक्त पदे राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार/कार्यपध्दतीनुसार भरण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(१९) * ४१२७६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३८१७० ला दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांना गत अनेक वर्षापासून केवळ चाळीस रुपये विदयावेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विदयार्थ्यांकडून विदयावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार विदयावेतनात वाढ करण्याच्या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय व त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे देण्यात येत असलेल्या विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव अदयापि शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मानखुर्द, मुंबई येथे अज्ञात इसमाने एका मुलाचे अपहरण करुन हत्या केल्याबाबत

**(२०) * ४१९१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलांचे अपहरण करुन हत्या घडत असलेल्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून नुकतीच मुंबईतील मानखुर्दमध्ये हनुमान जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या रॅलीत काही अज्ञात इसमाने एका ११ वर्षीय मुलाचे अपहरण करुन हत्या केल्याची घटना माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द मानखुर्द पोलिसांनी अपहरणासह हत्या केल्याचा गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अज्ञात मारेकऱ्याला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे काय, तसेच सीसीटीव्ही कॅमेरे असूनही गुन्हेगार पकडले न जाण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(४) तसेच अशाप्रकारच्या घटना वारंवार घडू नयेत याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०१/०४/२०१८ रोजी फिर्यादी यांना दिलेल्या तक्रारीवरुन, ११ वर्षाच्या मुलाचा शोध घेवूनही तो मिळून न आल्याने, मानखुर्द पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द गु.र.क्र. ९२/१८ भा.दं.वि. ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपासादरम्यान दिनांक ०२/०४/२०१८ रोजी सदर मुलाचा मृतदेह मिळून आल्याने व याबाबत फिर्यादींनी संशय व्यक्त केल्याने यामध्ये भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) सदर गुन्हयात अद्याप आरोपी अटक नसून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

मयत मुलाचा मृतदेह ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे उपलब्ध नाहीत. तसेच शासकीय कॅमेऱ्याचे फुटेज तपासण्यात आले असून गुन्हयासंदर्भात उपयुक्त माहिती मिळून आली नाही.

(४) सदर घटना घडू नयेत म्हणून पोलीस ठाणे हद्दीत बिट मार्शल, मोबाईल वाहने यांची सतत गस्त ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहरातील शिवशंकर होडा कंपनीने ग्राहकांची व महानगरपालिकेची फसवणूक केल्याबाबत

**(२१) * ४२५१५ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील शिवशंकर होडा कंपनीने सन २०१२ ते २०१७ या कालावधीत एल.बी.टी.च्या नावाने ग्राहकांकडून ३ टक्के रक्कम वसुल करून ग्राहकांची व महानगरपालिकेची फसवणूक केल्याची घटना दिनांक २० एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिवशंकर होडा कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाची तक्रार चंद्रपूर महानगरपालिकेस दिनांक २६/०४/२०१८ रोजी प्राप्त झाली होती.

(२) चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०१/११/२०१२ पासून स्थानिक संस्था कर लागू झाला. त्यानुसार दिनांक ०१/११/२०१२ ते दिनांक १०/०९/२०१३ या कालावधीत दोन चाकी वाहनांवर स्थानिक संस्था कराचा दर ३ टक्के इतका होता.

त्यानंतर दिनांक १०/०९/२०१३ ते दिनांक ३०/०६/२०१७ या कालावधीत दोन चाकी वाहनावरील स्थानिक संस्था कराचा विहीत दर दोन टक्के इतका होता.

चंद्रपूर शहरातील शिवशंकर होंडा कंपनीने वरील विहीत दरानेच सदर कराची ग्राहकांकडून वसूली व विहीत दरानेच महापालिकेकडे भरणा केला असून, ग्राहकांची फसवणूक केली नसल्याचे महानगरपालिकेच्या अहवालात नमुद आहे.

तथापि, चंद्रपूर शहरातील शिवशंकर होंडा कंपनीने फसवणूक केल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने शिवशंकर होंडा कंपनीचे लेखे मनपाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाकडून तपासले असता, कंपनीकडून रुपये १६,७७,५३८/- एवढे अतिरिक्त दायित्व निघते. त्याच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पाचपावली, इंदोरा, जरीपटका, नंदनवन परिसरात नशेचे पेन विकले जात असल्याबाबत

**(२२) * ४२४७५ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पाचपावली, इंदोरा, जरीपटका, नंदनवन परिसरातील शाळांच्या आजूबाजूला असलेले पानठेले व लहान दुकानातून विद्यार्थ्यांना ४०० रूपयांत नशेचे पेन विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेन एकट्या मुलाला विकला जात नसून दोन तीन मुलांना मिळून विकला जात असल्यामुळे एकाच वेळी एकापेक्षा जास्त मुलांना व्यसनाच्या विळख्यात ओढले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर मधील पाचपावली, इंदोरा, जरीपटका, नंदनवन परिसरात या प्रकारचे गुन्हे घडल्याबाबत स्थानिक पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत रूजू झालेल्या जमातीच्या लोकांना जाती प्रमाणपत्र व वैधता मिळण्याबाबत

**(२३) * ४२३७९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी सेवेत रूजू झालेल्या, पदोन्नती घेतलेल्या आदिम जमातीच्या (हलबा, हलबी, माना, गोवारी, कोळी महादेव, धनगर) कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण प्रदान करून आदिम जमातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र व वैधता मिळण्याबाबत त्वरीत निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करुन न्याय देण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन देवून विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या मागास प्रवर्गातील जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींनी त्यांना शासकीय सेवेत संरक्षण मिळण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केल्या होत्या. अशा सर्व याचिका एकत्रित करून मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल

क्र. ८९२८/२०१५ (चेअरमन अॅण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६/०७/२०१७ रोजी दिलेल्या सविस्तर निकालपत्राद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते, असा निर्णय दिला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६/०७/२०१७ च्या आदेशाची एकदम अंमलबजावणी केल्यास त्याचे राज्यात दुरगामी प्रतिकुल परिणाम होऊ शकतात. याचा विचार करुन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी व शासनास शिफारस करण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने शिफारस केल्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर उपसमितीच्या शिफारशींवर अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांना जात प्रमाणपत्र अवैध ठरले म्हणून सेवेतून कमी करण्यात येऊ नये, अशा स्वरूपाचा निर्णय घेण्यात आला आहे.

तथापि, शासनाच्या दिनांक ५ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयास ऑरगनाईझेशन फॉर द राईट ऑफ ट्रायबल या संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. ३१४०/२०१८ याद्वारे आव्हान दिले असून, मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११ जून, २०१८ रोजीच्या आदेशान्वये शासन निर्णयास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेतून विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्र (टीडीआर) चोरी झाल्याबाबत

**(२४) * ४२४३१ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून निर्माण झालेल्या हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) खर्ची टाकण्यासाठी पुणे महापालिकेकडे आलेल्या हजारो चौरस फुटांच्या तीन डीआरसी (विकास हस्तांतरण प्रमाणपत्र) चोरीस गेल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार टीडीआर चोरीचा तपास लावण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, पुणे महानगरपालिकेत डीआरसी गहाळ झालेल्या आहेत. डीआरसी क्र. ४४८५, ४२४०, ४४१८ या तीन डीआरसीपैकी डीआरसी क्र. ४४८५ स्लमची डीआरसी असून डीआरसी क्र. ४२४०, ४४१८ या ॲमिनीटीच्या डीआरसी आहेत. तिन्ही डीआरसींचे एकूण क्षेत्र ४३५३.६० चौ.मी. इतके आहे. तसेच या डीआरसी गहाळ होणेपुर्वी त्यावर २३४४.०५ चौ.मी. इतके क्षेत्र शिल्लक होते.

(२) डीआरसी गहाळ झाल्याबाबत पुणे महानगरपालिकेने दिनांक २३/०३/२०१८ रोजी पोलीस विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस देवुन त्यांचा खुलासा अपेक्षिलेला आहे. पोलीस विभागाकडे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने अदयाप त्यांचेकडून महानगरपालिकेस अहवाल प्राप्त झालेला नाही. तसेच गहाळ डीआरसी रद्द करुन डुप्लिकेट डीआरसी तयार करणेची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु असून तोपर्यंत गहाळ डीआरसीचा वापर प्रतिबंधित राहील.

(३) लागू नाही.

-----------------

## भायखळा, मुंबई येथील राणीबागेतील नाट्यगृहाचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२५) * ४१७७७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील राणीबागेतील खुले नाट्यगृह अजूनही पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त नाट्यगृहाचा पुनर्विकास करताना ध्वनिप्रदूषणाच्या त्रासापासून प्राणांना व पशुपक्षांना वाचविण्याबाबत वा सुरक्षित ठेवण्याबाबत शासनाने चौकशी करुन उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) भायखळा येथील वीर जिजामाता उद्यानामध्येपूर्वी खुले असलेले ७८० आसन क्षमतेच्या अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाच्या पुनर्विकासचे काम दिनांक ०६/०१/२०१७ रोजी सुरु करण्यात आले आहे.

सदर पुनर्विकास प्रकल्पाचा कालावधी ३ वर्ष आहे. सद्य:स्थितीत तळघराचे काम पूर्ण झाले असून माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) नाट्यगृहाचा पुनर्विकास करताना ध्वनिप्रदूषणाचा प्राण्यांना व पशुपक्षांना त्रास होऊ नये याकरीता सुरक्षा भिंतीलगत ध्वनी अडथळा कवच (साऊंड बॅरीअर) लावण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत भुयारी मेट्रो ट्रेनच्या रस्ते खोदकामामुळे पावसाळयात पाणी तुंबण्याचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(२६) * ४१९९७ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत भुयारी मेट्रो ट्रेन प्रकल्पाकरीता कोणतीही परवानगी न घेताच ठिकठिकाणी रस्त्याचे खोदकाम मेट्रो प्रशासन करीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या मान्सूनपूर्व सर्वेक्षणानुसार यावर्षी मुंबईतील २२५ ठिकाणी पावसाळ्यात पाणी तुंबण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने मेट्रोच्या रस्ते खोदकामामुळे मुंबई तुंबण्याचा धोका अधिक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पावसाळयात पाणी तुंबून नागरिकांची निर्माण होणारी गैरसोय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्सूनपूर्व सर्वेक्षणानूसार तसेच गतवर्षीच्या पावसाळयाच्या पूर्वानुभावानूसार २२५ ठिकाणी पाणी भरण्याची शक्यता असलेली ठिकाणे निश्चित केली आहेत. सदर ठिकाणी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यासाठी आवश्यक त्या पर्जन्य जलवाहिन्या सुधारणेची कामे प्रस्तावित केलेली आहेत व उर्वरीत ठिकाणी पूरेशा पंपाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

प्रस्तावित भुयारी मेट्रो रेल्वेच्या कामामुळे बाधित झालेल्या पर्जन्य जलवाहिन्यांची दुरुस्ती, स्थलांतरण व आवर्धन करण्याची योग्य ती कार्यवाही मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून करण्यात येत आहे. प्रस्तावित मेट्रो रेल्वे स्टेशन परिसरात साचणारे पाणी उपसण्यासाठी २४१ पंपाची व्यवस्था मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मार्फत कामाच्या सभोवताली बॅरिकेट्स लावण्यात आले असून शेजारील नालेसफाई देखील करणेत आली आहे.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्त बाधित गावांसाठी दोनच मराठी शाळा सिडको देत असल्याबाबत

**(२७) * ४२०६० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधित वाघिवली, गणेशपूरी, कोंबडभुजे, तरघर, उलवे, वरचा ओवळे, वाघिवलीपाडा, कोल्ही, कोपर व चिंचपाडा (ता.पनवेल, जि.रायगड) या प्रत्येक गावात रायगड जिल्हा परिषदेची एक शाळा अशा एकूण १० मराठी शाळा होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्त बाधित ५ गावामागे एकच जिल्हा परिषदेची मराठी शाळा सिडको सुरू करणार असल्याने १० गावांसाठी फक्त दोनच शाळा देण्यात येत असून सदर शाळा गावाच्या अंतरापासून दूर असल्यामुळे पहिलीतील लहान मुलांसह इतर विद्यार्थ्यांना गैरसोईचा सामना करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनामार्फत १० गावामागे दोनच शाळा देण्यात आल्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे स्थलांतरीत होणाऱ्या १० गावांपैकी चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघिवलीवाडा व वरचे ओवळे या ५ गावांचे वडघर गावाच्या हद्दीत व उलवे, गणेशपूरी, कोंबडभुजे, तडघर व वाघिवली या ५ गावांचे वहाळ गावाच्या हद्दीत पुनर्वसन होणार आहे. या दोन्ही ठिकाणी अनुक्रमे ३५७६.६९ चौ.मी. व ४३५९.६८ चौ.मी. एवढे बांधीव

क्षेत्रफळ असलेल्या दोन शालेय इमारती बांधण्यात आल्या आहेत. सदरहू दोन्ही शाळांचे बांधीव क्षेत्रफळ हे १० गावांमधील अस्तित्वात असलेल्या १० शाळांच्या बांधीव क्षेत्रफळाच्या अडीचपट आहे. त्यामुळे या १० शाळांमधील सद्या असलेल्या पटसंख्येच्या अडीचपट पटसंख्या या दोन शाळांमध्ये सामावणार आहे. तसेच, सदरहू १० गावांचे अनुक्रमे वडघर व वहाळ गावांच्या हद्दीत करण्यात आलेले पुनर्वसन हे प्रत्येकी १ ते १.५ कि.मी परिसरात असल्याने शालेय विद्यार्थ्यांना ते गैरसोईचे होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे व फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत

**(२८) * ४१५०० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपलिका हद्दीतील बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करणे, फेरीवाले हटविणे इत्यादी कामासाठी महानगरपालिका अधिकारी कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी तैनात करण्यात आलेल्या ५७ पोलिसांच्या वेतनावर गत तीन वर्षात महानगरपालिकेच्या तिजोरीतून रुपये ८ कोटी ६६ लाख ३५ हजार ४६९ खर्च करण्यात आल्याची बाब माहितीच्या अधिकारामार्फत माहे मे, २०१८ च्या पहिल्या पंधरवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत तीन वर्षात कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व फेरीवाल्यांच्या संख्येत वाढच झालेली असून पोलीस बंदोबस्ताअभावी अनधिकृत बांधकामे व फेरीवाले नियंत्रणाबाबतच्या कारवाईत अडथळे आल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांच्या माध्यमातून किती बांधकामे निष्कासित करण्यात आली असून एवढे पोलीस बळ असतानाही वाढणारी अनधिकृत बांधकामे व फेरीवाल्यांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेता जनतेच्या पैशाचा

अधिकाऱ्यांच्या नियोजनाअभावी अपव्यय होत असल्याने शासनाने संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) महानगरपालिकेकडून उपलब्ध पोलिसांकडून अनधिकृत बांधकामे व फेरीवाले यांचेवर नियमित कारवाई करण्यात येते.

महानगरपालिका क्षेत्रात जेव्हा मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे निष्कासनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. अशावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी कार्यरत पोलीस बळाव्यतिरिक्त स्थानिक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेण्यासाठी पोलीस विभागाकडे मागणी करण्यात येते

पोलीस विभागाने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त दिल्यानंतरच निष्कासनाची कारवाई करण्यात येते.
(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये कार्यरत पोलिसांच्या माध्यमातून फेरीवाल्यांवर दैनंदिन कारवाई करण्याबरोबरच माहे जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१७ अखेर एकुण ५६२१ इतकी अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. त्यामुळे पैशाचा अपव्यय होतो अशी वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरी क्षेत्रात अनधिकृत बांधकामांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याबाबत

**(२९) * ४२४८४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी क्षेत्रात नियमबाहय तसेच पुरेशी परवानग्या प्राप्त न करताच विकासकांकडून उभारल्या जाणाऱ्या अनधिकृत बांधकामांमुळे सदनिकाधारक तसेच गाळेधारकांची होणारी फसवणूक रोखण्याकरीता महापालिकेच्या संकेतस्थळांवर तसेच वर्तमानपत्रात अनधिकृत बांधकामाची यादीच विकासकांच्या नावांसह प्रसिध्द करण्याचे आदेश नगरविकास विभागाने दिले असल्याचे दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करण्याच्या सर्वंकष सूचना दिनांक ०३ मे, २०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत.

या अंतर्गत अधिकृत व अनधिकृत बांधकामाची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यासह इतर सूचना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आल्या आहेत.

(२) महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ (क) नुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन प्रशमित संरचना घोषित करण्यासाठी दिनांक ०७ ऑक्टोंबर, २०१७ रोजी अंतिम मान्यता दिलेले नियम प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी नियोजन प्राधिकरणाने सहा महिन्यात अर्ज मागविणे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ मधील उक्त तरतुदी अन्वये नियमित न होणाऱ्या अनधिकृत बांधकामाबाबत शासन परिपत्रक दिनांक ०२ मार्च, २००९ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी अनधिकृत बांधकामाविरूद्ध निरंतर कारवाई करणे आवश्यक आहे.

उक्त दिनांक ३ मे, २०१८ परिपत्रकातील तरतूदी दिनांक ३ मे, २०१८ पासून लागू आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली, मुंबई येथील पोयसर नदीच्या स्वच्छतेकरीता तरंगत्या बेटांची आणि तरंगत्या भिंतीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * ४२३१० श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली, मुंबई येथील पोयसर नदीच्या स्वच्छतेकरीता तरंगत्या बेटांची आणि तरंगत्या भिंतीचा प्रस्ताव महापालिकेला सादर करूनही उक्त प्रस्तावावर महापालिकेने कोणताच विचार केला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कारणास्तव सदर नदीची स्वच्छता योग्य प्रकारे होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोयसर नदीवर कांदिवली (प) येथे हिरानंदानी हेरिटेज या निवासी संकुलाजवळ १०० मी. च्या पट्टयात नदीच्या स्वच्छतेकरीता तरंगत्या बेटाची योजना करण्याचा प्रस्ताव “रिव्हर मार्च” या संस्थेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

पोयसर नदीमध्ये १०० मीटरच्या पट्टयात तरंगत्या बेटाच्या प्रस्तावाचा आराखडा निश्चित करण्यात आला असून सदर प्रकल्प “प्रायोगिक तत्वावर राबविण्यास” महानगरपालिकेमार्फत दिनांक २२/०६/२०१८ रोजी मंजूरी देण्यात आली आहे.

रिव्हर मार्च संस्था सदर प्रायोगिक प्रकल्प स्वखर्चाने राबविणार असून सदर संस्थेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) पोयसर नदीतील गाळ काढून पावसाळ्यापूर्वीची साफसफाई बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारामार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

तसेच नदीमधून वाहणारा तरंगता कचरा समुद्रात जाण्यास अटकाव करण्यासाठी पोयसर व मिठ चौकी (मालाड) जवळ ट्रॅश ब्रुमची योजना केली आहे. या ठिकाणी अडवलेला कचरा कंत्राटदारामार्फत उचलण्यात येऊन क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो.

तसेच, पोयसर नदीच्या पुनरुज्जिविकरणासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेतील कचरा वाहतुक कंत्राटी कामगारांना किमान वेतन देण्याबाबत

**(३१) * ४१५१७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन साफसफाई व त्यातून निघणाऱ्या कचऱ्याची वाहतुक डम्पिंग ग्राऊंडपर्यंत करण्याचे कंत्राट मे.ए.जी.इनव्हायरो या कंपनीला गत ७ वर्षापासून देण्यात आले असून कंत्राटदाराने महानगरपालिकेच्या सफाई कामगारांप्रमाणे किमान वेतन देणे बंद केल्यामुळे घंटागाडीवरील ७५० कंत्राटी कामगारांनी दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी दिवसभर कचऱ्याची वाहतुक न करता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना किमान वेतनानुसार वेतन देण्याबाबत संबंधिताना निर्देश देण्याची मागणी समर्थन संस्थेने दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव (नगरविकास) यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन कचरा वाहतुकीचे काम मे.ए.जी.इनव्हायरो प्रो.लि. यांना माहे जानेवारी, २०१५ पासून देण्यात आलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध कामगार संघटनांनी किमान वेतन अदा करण्याबाबत केलेल्या मागणीनुसार कंत्राटदाराने किमान वेतन बंद केल्यामुळे दिनांक ११/०४/२०१८ रोजी ठिय्या आंदोलन केले, ही वस्तुस्थिती आहे.
(२) श्री.रूपेश किर, प्रतिनिधी समर्थन यांनी दिनांक २४/०४/२०१८ व दिनांक २५/०४/२०१८ रोजी लेखी निवेदनाद्वारे महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना किमान वेतनानुसार वेतन देण्याची मागणी केली आहे.
(३) उपरोक्त निवेदनाचे अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी दिनांक ११/०६/२०१८ च्या शासन पत्रान्वये आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यास अनुसरून नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम मालक (Principal Employee) या नात्याने कचरा वाहतुक कंत्राटी कामगारांना किमान वेतन देणेबाबत कचरा वाहतुक कंत्राटदार मे.ए.जी.इनव्हायरो इन्फा प्रो.लि. यांना कामगारांच्या किमान वेतनामधील फरक त्यांच्या मासिक देयकामधून महानगरपालिकेमार्फत कपात करून घेणेबाबतची नोटीस दिली होती.

सदर नोटीशीच्या विरोधात संबंधित कंत्राटदाराने मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. १५२०९/२०१८ दाखल केली आहे. दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने कंत्राटदारांच्या देयकातून रक्कम कपात करण्यास पुढील निर्णय होईपर्यंत स्थगिती दिली आहे.

कंत्राटी कामगारांना अनुज्ञेय असलेले किमान वेतन लवकरात लवकर मिळण्याचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती उठविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मा.उच्च न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडून स्थगिती उठविण्याची तसेच कंत्राटी कामगारांना किमान वेतन देण्याची दक्षता घेण्याबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील वीटभट्टी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(३२) * ४२४८६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे वीटभट्टी कामगारांनी वीटभट्टी उद्‌योगाला शासनाचे संरक्षण मिळणे, अपघात विमा योजना लागू करणे, कामगारांच्या मुला-मुलींना शिक्षणाची मोफत सोय करणे इत्यादी विविध मागण्या मान्य व्हाव्यात याकरीता दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुक मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीटभट्टी कामगारांच्या मागण्या मान्य करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.

(२) मागण्यांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच, इमारत व इतर बांधकाम मंडळातर्फे त्यांना लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी न केल्याबाबत

**(३३) * ४१२५६ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांची जयंती साजरी करण्याकरीता दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी परिपत्रक काढले असून सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत सेवालाल महाराजांची जयंती करण्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी आदेश दिले असतानांही यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उक्त जयंती साजरी करण्यात आली नसल्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना विविध संघटनांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सदर महाविद्यालयाच्या अधिष्ठातावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संत सेवालाल महाराज यांची जयंती वसंतराव नाईक शासकीय वैदयकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे साजरी करण्यात आली नसल्याबाबतचे निवेदन दिनांक २०/०२/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालयास प्राप्त झाले.

वसंतराव नाईक शासकीय वैदयकीय महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी साजरी करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापुरे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) गावातील महिलेचे नवजात बाळ नरबळी देण्याच्या उद्देशाने पळविल्याबाबत

**(३४) * ४१५३६ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापुरे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) गावातील आदिवासी महिलेचे नरबळी देण्याच्या उद्देशाने पळविलेले नवजात बाळ पाच कुंडल्याचीवाडी येथील घोटी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घनदाट जंगलात सापडल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींचा शोध घेण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली असता सदर बालक हे वन विभागाच्या डोंगरात तिचे चुलते यांना सूखरुप मिळून आले आहे. त्यामुलीच्या आई वडील यांची चौकशी केली असता त्यांनी संशयास्पद असा कोणताही प्रकार घडलेला नसल्याचे सांगितले आहे.

सदर प्रकरणी कोणीही फिर्याद देण्यास न आल्याने सहा. पोलीस निरीक्षक यांनी सरकार तर्फे फिर्याद देऊन घोटी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८४/२०१८ भा.दं.वि.स. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## बिलोरी (ता.देगलूर, जि.नांदेड) शहरास सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत

**(३५) * ४२२०७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील बिलोरी शहरास मांजरा नदीपात्रातील बोळेगाव येथून भूमिगत विहिरीतून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा होत असून या पाईपलाईनला ठिकठिकाणी गळती लागल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा सुरळीत नसल्यामुळे येथील नागरीकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत असून पालिका प्रशासन वर्षातून ३६५ दिवसांचा पाणीकर वसूल करत असूनही नागरिकांना पाणी मिळत नसल्याने यापुढे पाणीकर भरणार नसल्याचा निर्णय येथील नागरिकांनी घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बिलोली शहरास १४ कि.मी. अंतरावरून मांजरा नदी उद्भवावरुन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सध्या बिलोली शहरास दरडोई ५० ते ५५ लिटर पाणीपुरवठा होत आहे.

पाणी कर भरणा करणार नसल्याबाबतचा निर्णय बिलोली शहरातील नागरिकांनी घेतलेला नसून, अशी एकही लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचे मुख्याधिकारी, बिलोली नगरपरिषद यांनी अहवालात नमूद केले आहे.

बिलोली शहरास नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना बिलोली नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महानगरपालिका व खाजगी रुग्णालयात पी.पी.पी. तत्वावर डायलिसीस सेंटर उभारण्याबाबत

**(३६) * ४२३५८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गरीब रुग्णांना अधिकाधिक लाभ मिळावा याकरीता महानगरपालिका रुग्णालयात व काही खाजगी रुग्णालयात पी.पी.पी. तत्वावर ५५ डायलिसीस सेंटर उभारण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य नागरिकांना डायलिसीस उपचार पद्धतीचे दर परवडत नसल्याने कमी दरात सदर उपचार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करून किती व कोणकोणते डायलिसीस सेंटर उभारले आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३ प्रमुख रुग्णालयामध्ये स्वतंत्र डायलिसिस विभाग कार्यरत आहे.

कुपर व ट्रॉमा केअर या प्रमुख रुग्णालयात अनुक्रमे ५ व १० रुग्णशय्या असलेला डायलिसिस विभाग पी.पी.पी. तत्वावर कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ उपनगरीय रुग्णालयांमध्ये एकूण ४३ रुग्णशय्या असलेली डायलिसिस केंद्रे पी.पी.पी. तत्वावर कार्यरत असून ३ रुग्णालयात डायलिसिस सुविधा कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत ३ ठिकाणी एकूण ३७ रुग्णशय्या असलेली डायलिसिस केंदे पी.पी.पी. तत्वावर कार्यान्वित असून ३ ठिकाणी डायलिसिस केंद्रे कार्यान्वित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच ८ ठिकाणी डायलिसिस सुविधा पुरविण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयांतील डायलिसिस विभाग हे महानगरपालिकेमार्फत चालविले जात असल्यामुळे कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

तसेच पी.पी.पी. तत्वावर चालविण्यात येणाऱ्या डायलिसिस केंद्रांमध्ये प्रत्येक सत्राकरीता रुपये २०० ते ३५० पर्यंत दर आकारण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील सिडको एन-४ मध्ये लोककल्याण समितीमार्फत नाल्यावर स्वच्छतागृहाचे बांधकाम केल्याबाबत

**(३७) * ४२५६५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील नाल्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी नसतानाही सिडको एन-४ येथे लोककल्याण समितीमार्फत नाल्यावरच स्वच्छतागृहाचे बांधकाम सुरु केले असल्यामुळे सदर वसाहतीमध्ये नाल्याचे पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनधिकृत बांधकाम रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) औरंगाबाद शहरातील सिडको एन-४ मध्ये हनुमान मंदिर असून सदर मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. त्यामुळे ट्रस्टींनी मंदिराच्या शेजारील नाल्यावर स्वच्छतागृहाचे बांधकाम सुरु केले होते, हे खरे आहे.

प्राप्त तक्रारीनुसार महानगरपालिकेने सदर बांधकाम पूर्णपणे थांबविले असून या प्रकरणी पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील भुमिगत गटार योजना प्रशासकीय कामांमुळे प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * ४१५४९ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५७५ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील अत्यंत महत्वाकांक्षी भुमिगत गटार योजना ही काही प्रशासकीय कामांमुळे प्रलंबित असून शासनाच्या परिपत्रकानुसार योजनेचे काम प्रारंभ होण्यापूर्वी दोन्हीही एस.टी.पी.च्या जागेचे संपादन करणे जरुरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामाचा चाचणी अहवाल अमरावती अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक असून सदर महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या चाचणी अहवालामध्ये करारनाम्यात विपरित साहित्य वापरण्यात आले असल्याचे स्पष्ट नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अहवाल हा तीन दिवसांमध्ये बदलण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‍नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अकोला शहरासाठी रुपये ७९.२३ कोटीच्या मलनिस्सारण प्रकल्पास माहे मे, २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर मलनिस्सारण प्रकल्पामध्ये मौजे शिलोदा व पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर अशा दोन ठिकाणी मलशुध्दीकरण केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

त्यापैकी मौजा शिलोदा येथील जागेचा आगाऊ ताबा डिसेंबर, २०१७ मध्ये प्राप्त झाला असून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर येथील जागा मलशुध्दीकरण केंद्रासाठी विद्यापीठ कार्यकारी परिषेदेने तत्वत: मान्यता दिल्याने सदर कामाचे कार्यादेश डिसेंबर, २०१७ मध्ये दिलेले आहेत.

सध्या मौजे शिलोदा येथील मलशुध्दीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर येथील जागा संपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(२), (३), (४) व (५) सदर योजनेमध्ये सुरु असलेल्या कामामध्ये आवश्यक दर्जाचे साहित्य वापरण्यात नसल्याबाबत तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत अकोला महानगरपालिकेकडे करण्यात आली होती.

त्यानुसार अकोला महानगरपालिकेने सदर तक्रारींच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

सदर चौकशीअंती सदर तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आली नसल्याचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांनी अकोला महानगरपालिकेस कळविलेले आहे.

-----------------

## केंद्र शासनाने अमृत योजनेनुसार पिण्याचे पाणी, मलनिःसारणाची सोय आणि हरितपट्टे तयार करण्यासाठी निधी देण्याबाबत

**(३९) * ४१४६९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने अमृत योजनेनुसार राज्यातील ४४ शहरांना पिण्याचे पाणी, मलनिःसारणाची सोय आणि हरितपट्टे तयार करण्यासाठी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निधी देण्यास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेसाठी शासनाने कोणकोणती शहरे निवडली असून त्याची अमंलबजावणी सुरु केली आहे काय, तसेच उक्त योजनेसाठी केंद्र शासनाकडून माहे जून, २०१८ अखेर किती निधी प्राप्त झाला व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे व सदर योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे, याबाबत चौकशी करुन शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान राज्यामध्ये सन २०१५ पासून राबविण्यात येत असून त्यामध्ये राज्यातील ४४ शहरांचा समावेश आहे.

सदर अभियानांतर्गत राज्य शासनाच्या रुपये ७७५७ कोटी किमंतीच्या आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

सदर आराखड्यानुसार राज्यामध्ये पाणीपुरवठा व मलनिःसारण विषयक ६९ व हरित क्षेत्राचे एकूण १२८ असे एकूण १९७ प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

त्यापैकी १८३ प्रकल्पांची कामे सुरु झालेली असून १४ प्रकल्पांची कामे निविदाधीन आहेत.

अमृत अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आराखड्यानुसार प्रथम हप्त्यापोटी केंद्र व राज्य शासनाचा मिळूण रुपये १०६०.२५ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

आतापर्यंत सदर योजनेवर रुपये ६२८ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

सदर योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांची कामे अभियान कालावधीमध्ये विहीत कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

-----------------

## डोंबिवली-कल्याण महापालिकेत (जि.ठाणे) समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(४०) * ४३४८५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३९०८२ ला दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली-कल्याण महापालिकेत (जि.ठाणे) समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये गत अनेक महिन्यापासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणच्या पाणी प्रश्नांवर तोडगा काढण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मधील २७ गावांना सद्य:स्थितीत ६० द.ल.ली. प्रतिदिन इतका पाणीपुरवठा आवश्यक असतांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेल्या नळजोडण्यांव्दारे ४५ ते ४८ द.ल.ली. इतका पाणीपुरवठा होत आहे. सदर पाणीपुरवठा पुरेसा नाही, ही वस्तुस्थिती आहे.

२७ गावातील झपाट्याने वाढत असलेल्या नागरीकीकरणामुळे पाणीपुरवठा कमी पडत असल्याने आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो.

(२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २७ गावांसाठी रुपये १८०.८१ कोटी किंमतीची पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे.

सदर योजनेमध्ये २१ कि.मी. उर्ध्ववाहिनी, १७ कि.मी. लांबीची गुरूत्ववाहिनी, २८ जलकुंभ व २२३ कि.मी. वितरण व्यवस्थेचा प्रामुख्याने समावेश आहे.

सदर प्रकल्पाची निविदा अंतिम टप्प्यामध्ये आहे.

सद्य:स्थितीत वितरण व्यवस्था सुधारणेसाठी महानगरपालिका निधीतून रुपये ५२१.०० लक्ष किंमतीचे २७ प्राकलने मंजूर करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग बंद होत असल्याबाबत

**(४१) * ४३६७१ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभागात वर्षाला हजारहून अधिक शस्त्रक्रिया केल्या जात होत्या, परंतु सद्य:स्थितीत या विभागात शस्त्रक्रिया करण्याकरीता जुने, बिघडलेले ऑपरेशन टेबल, अपुऱ्या इनफ्युजन पंप, ऑपरेशन थिएटरमधील दिवे, हेडलाईट, मॉनिटर्स नवीन यंत्रणा न आणल्यामुळे विनावापर असून सदर विभागात काम करणारे डॉक्टर त्रस्त व संतप्त झाल्यामुळे सदर विभाग बंद करण्याबाबतचा सल्ला संबंधित अधिष्ठात्यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक १४/०४/२०१८ रोजीच्या “मुंबई मिरर” या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) नायर रुग्णालयात सन २०१७ मध्ये ३६० ओपनहार्ट व १०० इतर हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून माहे जानेवारी, २०१८ ते जून, २०१८ या कालावधीत १७९ ओपनहार्ट व ६० इतर हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

नायर रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभागात ३ ऑपरेशन टेबल, २ ऑपरेशन लाईट्स, १ हेडलाईट, ३ हार्टलंग मशीन्स, १२ इनफ्युजन पंप व ६ मॉनिटर्स इत्यादी सर्व आवश्यक उपकरणे सुस्थितीत असून त्यांचा वापर नियमितपणे केला जात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर महानगरपालिकेतील परिवहन कामगारांच्या थकीत वेतनाबाबत

**(४२) * ४३७४६ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील कामगारांच्या थकीत वेतन व निवृत्त वेतनाची रक्कम खात्यावर जमा करणे व त्यानुषंगाने इतर मागण्यांसाठी परिवहन कामगारांनी महाराष्ट्र दिन दिनांक १ मे, २०१८ रोजी मशाल मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीचे आदेश देऊनही संबंधित अधिकारी याकडे लक्ष देत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सोलापूर परिवहन कामगारांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी यासंदर्भात परिवहन उपक्रमातील कर्मचारी व त्यांच्या समवेत बैठका घेऊन चर्चा केली आहे. तथापि, या चर्चेने समाधान न झाल्याने कर्मचारी व संघटना यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात यासंदर्भात प्रकरणे दाखल केली आहेत.

सोलापूर परिवहन उपक्रम हा सध्या तोट्यात चालला असल्याने उपक्रमाला कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर प्रदान करणे शक्य होत नाही. यासाठी आवश्यक निधी सोलापूर महानगरपालिकेलाच वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावा लागत आहे.

सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या थकित वेतनाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेने स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल केले असून ते प्रलंबित आहे.

निवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकित निवृत्तीवेतनाच्या रकमांबाबतचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार थकीत निवृत्तीवेतनाच्या रक्कमा प्रदान होण्याच्यादृष्टीने सोलापूर महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही सत्वर करावी, असे निदेश शासनाने महानगरपालिकेला दिले असून मा.उच्च न्यायालयास याबाबत अवगत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.बीड) येथे तरुणाला मारहाण केल्याबाबत

**(४३) * ४१२७९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.बीड) येथील कृष्णा यादव यांना लिंबाच्या झाडाला बांधून बेदम मारहाण करुन शेंदूर आणि गुलाल फासून हलगी हातात देऊन धिंड काढल्याची घटना घडल्याचे दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उपरोक्त प्रकरणी आतापर्यंत किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करुन कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी शिरूर कासार पोलीस स्टेशन, जिल्हा बीड येथे गुरनं ९६/२०१८ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२७, ३२३, ३४२, ५०४, ५०६, सह आर्म ॲक्ट कलम ४/२५ अन्वये दिनांक ३०/०४/२०१८ रोजी एकुण ११ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे ते सद्या न्यायालयीन कोठडीत असून उर्वरित आरोपी फरार आहेत. उर्वरित आरोपींना अटक करणे व मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## औद्योगिक वापरासाठी शेतकऱ्यांची जमीन स्वस्त दरात ताब्यात घेतल्याबाबत

**(४४) * ४२०१८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक वापरासाठी अधिसूचित केलेल्या जमिनी विनाअधिसूचित करताना मा.उद्योग मंत्री यांनी एककल्ली व नियमबाहय पध्दतीने निर्णय घेतल्याचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव के.पी.बक्षी यांच्या चौकशीतून निष्पन्न झाले असल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी विनाअधिसूचित करताना उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने लेखी अभिप्रायाचे उल्लंघन केल्याने जमीन विनाअधिसूचित करण्यासाठी उद्योग विभागाची शिफारस प्रतिकुल असल्याने मा.उद्योग मंत्र्यानी हे प्रकरण मा.मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून न देता निकटवर्तीयांना लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी परस्पर निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, के.पी.बक्षी समितीने सादर केलेल्या अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या अहवालाअंती दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) श्री.के.पी.बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशीचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. सदर अहवालात करण्यात आलेल्या शिफारशी तसेच इतर भूसंपादन कायदे यांच्या अनुषंगाने जमिनी अधिसूचित वा गैर अधिसूचित करणे याकरीता निश्चित कार्यपध्दती ठरविण्यासाठी सहमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली उदयोग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक ३१/०५/२०१८ अन्वये समिती गठीत केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालकामगारांची समस्या गंभीर असल्याबाबत

**(४५) * ४१३८३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालकामगार निर्मूलन कायदा व आखलेल्या विविध उपाययोजना यांच्या अंमलबजावणीत शासकीय यंत्रणा उदासिन असून राज्यात २५ लाखांहून अधिक बालके बालमजूरी करत असल्याचे “चाईल्ड राईट्स ॲण्ड यु” (क्राय) या संस्थेने प्रसिध्द केलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारंपारिक उद्योगांसोबतच रिटेल, ऑटोमोबाईल क्षेत्रातील विविध प्रकारच्या नव्याने उदयास येत असलेल्या व्यवसायिक क्षेत्रात बालकामगारांची संख्या वाढत असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास राज्यामध्ये सन २०१० पर्यंत बालकामगार मुक्त ध्येय राज्य शासनाने ठेवले असताना देखील सन २०१४ ते २०१६ या तीन वर्षाच्या कालावधीत मुंबई व ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक १०२८ बालके विविध आस्थापनांमध्ये कामे करताना माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या सप्ताहात आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात बालमजूरीचे प्रकार अधिक असल्याचे निदर्शनास येते, बालकांचे बाल मजूरीत शोषण होऊ नये व त्यांचा विकास खुंटू नये यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, बालकामगारमुक्त राज्याचे ध्येय शासनाने प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, बालकामगार ठेवल्याबाबत आतापर्यंत किती आस्थापनांविरुध्द शासनाने कारवाई केली तसेच बालकामगार नियंत्रणाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) "चाईल्ड राईट्स अॅण्ड यु" (क्राय) या संस्थेच्या सन २०११ च्या अहवालात देशात २५,३३,६३८ इतके बालकामगार दर्शविले आहेत. महाराष्ट्रात ७,२७,९३२ इतके बालकामगार दर्शविले असून महाराष्ट्रातील बालकामगारांमध्ये सन २००१ च्या तुलनेत ४.७% घट झाली असल्याचे नमूद केले आहे.
(३) सन २०१४ ते २०१६ या तीन वर्षांच्या कालावधीत मुंबई व ठाणे जिल्ह्यात एकुण ९८५ बालकामगार आढळून आले.
(४) व (५) शासनाच्या कृती दल यंत्रणेमार्फत नियमितपणे धाडसत्र आयोजित करुन मुक्त केलेल्या बालकामगारांना महिला व बालविकास विभागाकडे सुपूर्द केले जाते. कामगार आयुक्तालयाच्या यंत्रणेमार्फत संबंधित मालकाविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्यात येतो व पुढील कार्यवाही गृह विभागामार्फत करण्यात येते.

सन २०१५-१७ यामागील ३ वर्षात कृतीदलाने ६८९ धाडी घालून ५२६ बालकामगारांची मुक्तता केली आहे. तसेच, २२० एफ.आय.आर. दाखल केले आहेत.

कामगार आयुक्त कार्यालयामार्फत प्रभातफेरी, एस.टी. व बेस्ट बसवर माहिती प्रदर्शित करणे, रेडीओ तसेच दूरदर्शनवर जाहिरात प्रसारीत करणे, मालक संघटनांची बैठक आयोजित करून त्यांच्याकडून बालकामगार ठेवणार नसल्याबाबत हमी पत्र घेणे अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करून बालकामगार प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## कल्याण-डोंबिवली रिंगरुट रस्त्याकरीता भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(४६) * ४१७५६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) या शहरातील अंतर्गत रस्त्यावर होणारी वाहतुक कोंडी सोडविण्याकरीता २७ गाव उल्हास खाडी ते टिटवाळा असा रिंगरुट रस्ता बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याणमधील भूमी अभिलेख कार्यालयातून गत पाच वर्षापासून महापालिकेला या जमिनीचे नकाशे उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने भूसंपादनाची प्रक्रिया प्रलंबित असल्याने रिंगरुट रस्त्याच्या कामास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिंगरुट रस्त्यासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन सदरील रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांकरीता मंजूर विकास योजनेमधील प्रस्तावित बाह्यवळण रस्ता कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे संयुक्त विद्‌यमाने विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) व (३) सदर बाह्यवळण रस्त्याने बाधित २६ गावांमधील डोंबिवली विभागातील १४ गावांपैकी ७ गावांचे संयुक्त मोजणी नकाशे प्राप्त झालेले आहेत तर कल्याण विभागातील १२ गावांपैकी ११ गावांचे संयुक्त मोजणी नकाशे प्राप्त झालेले आहेत.

महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या संयुक्त मोजणी नकाशांच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका प्रसुतीगृहे चालवण्याकरीता गोरगरीब रूग्णांकडून दुप्पट शुल्क आकारीत असल्याबाबत

**(४७) * ४१८०३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्रसुतीगृहे चालविण्याकरीता नाममात्र शुल्कामध्ये भूखंड दिलेल्या काही सामाजिक संस्थांमार्फत गोरगरीब रूग्णांकडून दाम दुप्पट शुल्क वसूल करून गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवनार येथील ३०००.६८ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा एम.बी.बारवालिया फाऊंडेशन हया संस्थेला सन २००६ मध्ये प्रसुतीगृहासाठी देण्यात आली असून सुधारित सार्वजनिक खाजगी प्रोत्साहन धोरणांतर्गत सदर संस्थेस शासनामार्फत अतिरिक्त आरोग्य विषयक सेवा-सुविधा पुरविण्याकरीता परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळ उद्देशापासून फारकत घेवून सदर संस्थेमार्फत गरीब जनतेकडून भरमसाठ शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एम.बी.बारवालियावर फाऊंडेशन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रसुतीगृहे चालविण्याकरीता भूखंड देण्यात येत नाहीत. तथापि, समायोजित आरक्षणांतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या जागा "सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन" धोरणांतर्गत १३ संस्थांना प्रसुतीगृह चालविण्यासाठी देण्यात आल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

संस्था व महानगरपालिका यांच्यातील करारानुसार, संस्थेमार्फत किमान २५ टक्के रुग्णांना (महानगरपालिकेने संदर्भीत केलेले तसेच आणि पिवळी व केशरी शिधापत्रिकाधारक) महानगरपालिकेच्या दरात प्रसुतीसेवा पुरविणे बंधनकारक आहे.

(२) देवनार येथील ३०००.६८ चौ.मी. जागा मे. एम.बी.बारवालीया फाऊंडेशन या संस्थेला सन २००६ मध्ये प्रसुतीगृह चालविण्यासाठी ३० वर्षाकरीता देण्यात आली आहे ही वस्तुस्थिती आहे.

सन २०१७ च्या सुधारित सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत सदर संस्थेने अतिरिक्त आरोग्य विषयक सेवा-सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेस अर्ज केला असून अद्याप अतिरिक्त आरोग्य विषयक सेवा-सुविधा पुरविण्याकरीता परवानगी देण्यात आलेली नाही.

तसेच मे.एम.बी.बारवालीया फाऊंडेशनमार्फत प्रसुतीगृहाव्यतिरिक्त अन्य सेवा-सुविधा पुरविण्यात येत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) सदर संस्था व महानगरपालिका यांच्यातील करारानुसार, संस्थेमार्फत किमान २५ टक्के रुग्णांना म्हणजे महानगरपालिका संदर्भीत आणि पिवळी व केशरी शिधापत्रिकाधारक रुग्णांना महानगरपालिकेच्या दरात प्रसुतीसेवा पुरविल्या जात आहेत.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पोषणयुक्त न्याहारी योजना सुरु करण्याबाबत

**(४८) * ४२१०१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामधील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पोषणयुक्त न्याहारी योजना गत वर्षभरापासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी ई-निविदा मागविल्या असता त्याला ठेकेदारांचा अल्प प्रतिसाद मिळाला असून न्याहारी संबंधी असलेल्या निविदेच्या अटी व शर्ती तसेच सध्याच्या वाढलेल्या दरांमुळे ठेकेदार निविदा प्रक्रियेत भाग घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या संदर्भातील जाचक अटी व शर्ती शिथिल करून सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने महापालिकेला निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामधील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता असलेली "पोषणयुक्त न्याहारी योजना" माहे ऑक्टोबर, २०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीत ठेकेदाराकडून तांत्रिक बाबींची पुर्तता न झाल्यामुळे बंद होती.

(२) सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या ई-निविदांना प्रतिसाद मिळाला नाही ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) सदर योजना कार्यान्वित राहण्यासाठी सद्य:स्थितीत नायर रुग्णालयातील उपहारगृहास सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराकडून निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता "पोषणयुक्त न्याहारी योजना" अंतर्गत दिनांक २३/०४/२०१८ पासून न्याहरीचा पुरवठा करण्यात येतो.

-----------------

## नारपोली स्टेशनच्या हद्दीतील गोडावून परिसरामध्ये ज्वलनशील पदार्थांची साठवणूक केल्याबाबत

**(४९) * ४२०४३ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८१०८ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-२ च्या नारपोली स्टेशनच्या हद्दीतील गोडावून परिसरामध्ये ज्वलनशील पदार्थांची साठवणूक करणाऱ्या गोडावूनची माहिती प्राप्त करण्याबाबत तसेच त्यांचे सर्वेक्षण करुन कारवाई करण्याबाबतच्या सूचना जॉईंट चिफ कन्ट्रोलर, एक्सप्लोसिव्ह, नवी मुंबई यांना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जॉईंट चिफ कन्ट्रोलर, नवी मुंबई यांनी अद्यापपावेतो कोणकोणत्या गोडावूनवर कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माहे फेब्रुवारी, २०१८ चे पुर्वी बेकायदेशीर ज्वलनशील पदार्थांची साठवणूक करणाऱ्या गोडावूनची माहिती प्राप्त करुन सर्वेक्षणअंती कारवाई करण्याबाबतच्या सूचना जॉईंट चिफ एक्सप्लोसीव्ह विभाग, नवी मुंबई यांना नारपोली पोलीस स्टेशनकडून दिनांक ०८/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

रासायनिक भंडारे हे त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही असे जॉईंट चिफ एक्सप्लोसीव्ह विभाग, नवी मुंबई यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी यांना कळविले आहे.

तथापि, ज्वलनशील पदार्थाची साठवणूक करणाऱ्या गोडावूनचे सर्वेक्षण करुन नारपोली पोलीस स्टेशनकडून सन २०१६, २०१७ व २०१८ मध्ये एकूण ४ वेगवेगळे गुन्हे नोंद केलेले असून सदरचे सर्व गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच महसूल विभागाने दिनांक २७/०७/२०१७ रोजी अशा प्रकारच्या एकूण १५ गोडावून धारकांविरुध्द फौजदारी प्रक्रिया दंड संहिता कलम १३३ प्रमाणे कारवाई केलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोणी (ता.कल्याण, जि.ठाणे) गावात अनधिकृत स्फोटकांचा साठा जप्त केल्याबाबत

**(५०) * ४१७११ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोणी (ता.कल्याण, जि.ठाणे) गावात अनधिकृत स्फोटकांचा साठा दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किती जणांना अटक करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मानपाडा पोलीस ठाणे येथे गुरनं. ३४/२०१८ भादंविक. २८६, ३४ सह भारतीय स्फोटक पदार्थांचा अधिनियम १९०८ मधील कलम ५ व ६ प्रमाणे दिनांक १५/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यात १९९ नग जिलेटीन, १०० डिटोनेटर हस्तगत करण्यात आले आहे. या गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक झाली असून तिन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या वॉर्डात दुषित बर्फ आढळून आल्याबाबत

**(५१) * ४२१९४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्डात बर्फामध्ये कॉलीफॉम दुषितपणा ९८ टक्के तर ८६ टक्के नमुने कोलायुक्त असल्याचे आढळून आले असून सरबत विक्रेते, हॉटेलमध्ये मिळणारी सरबते, बर्फाचे गोळे येथे दुषित बर्फ मोठ्या प्रमाणात वापरला जात असल्याने सदर बर्फाचे पाणी पिणे आरोग्यासाठी घातक ठरू शकत असल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या पाहणीत तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासण्यांमधून दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गत महिन्याभरात काविळीच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असून बर्फासाठी वापरले जाणारे पाणी तसेच तयार झालेल्या बर्फाची हाताळणी, बर्फ ठेवण्यासाठी वापरली जाणारी अस्वच्छ जागा आदि कारणामुळे बर्फ दूषित होत असून काविळ आजारांचा फैलाव वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने खादय बर्फ रंगहिन आणि अखादय बर्फ निळया रंगामध्ये उत्पादित करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ३१ मार्च रोजी काढली असून सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करुन आतापर्यंत किती दुषित बर्फ विक्रेत्यांवर शासनामार्फत कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच दुषित बर्फ पुरवठा रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी केलेल्या पाहणीमध्ये बर्फाच्या नमून्यात दूषित बर्फ आढळून आला आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये माहे एप्रिल व मे, २०१८ मध्ये अनुक्रमे १०० व ७५ कावीळ रुग्ण आढळून आले आहेत.

(३) माहे एप्रिल व मे, २०१८ या कालावधीत मुंबई शहर व उपनगर परिसरात दूषित बर्फ आढळलेल्या आस्थापनांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

- ३९० आस्थापनांना निरिक्षण अहवाल (आय.आर.) देण्यात आले आहेत.
- ९० आस्थापनांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.
- ६ बर्फ उत्पादक आस्थापनांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.
- ७४,५२९ किलो बर्फ नष्ट करण्यात आला आहे.
- मुंबईतील बर्फ उत्पादक तसेच खाद्यपदार्थांसाठी बर्फाचा वापर करणाऱ्या आस्थापना निरिक्षणाखाली ठेवण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोग्रासवाडी, डोंबिवली (जि.ठाणे) येथील बिल्वदल इमारतीतील कुटुंबियांना घरे देण्याबाबत

**(५२) * ४३१९७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील गोग्रासवाडी भागातील नामदेव पाटील मधील बिल्वदल इमारतीला तडा गेल्याकारणास्तव महापालिकने ४८ कुटुंबांना तातडीने घराबाहेर काढून इमारत जमीनदोस्त करुन पावणेचार वर्षे उलटूनही अदयाप इमारतीतील ४८ कुटुंबियांना न्याय मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावणेचार वर्षे होवूनही न्याय न मिळाल्याने ४८ कुटुंबिये अदयापी बेघर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त ४८ कुटुंबियांना शासनाने न्याय देण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) डोंबिवली पश्चिम गोग्रासवाडी येथील बिल्वदल इमारतीमधील तळमजल्यातील फ्लॅटमधील एका कॉलमला तडे गेल्यामुळे इमारतीची स्थिती अतिधोकादायक झाल्याने, इमारत मालक यांनी सदरहू इमारत महानगरपालिकेच्या देखरेखीखाली व स्थानिक पोलिसांच्या सुरक्षेने पूर्णपणे जमिनदोस्त केलेली आहे.

महानगरपालिकेने या इमारतीमधील रहिवाश्यांना महानगरपालिकेच्या पांडूरंगवाडी येथील रात्रनिवारा केंद्रात तात्पुरती राहण्याची व्यवस्था केलेली होती.

तद्नंतर त्यामधील बरेचसे रहिवाशी त्यांच्या सोयीनुसार स्वतःहून अन्य जागी स्थलांतरीत झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुख्य शहरात "गेम किंग इंडिया" नावाने ऑनलाईन सट्टा सुरु असल्याबाबत

**(५३) * ४१२५० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७६६४ ला दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुख्य शहरात "गेम किंग इंडिया" नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरिकांची दररोज कोट्यवधीची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व प्रकार पोलीस यंत्रणेला तसेच सायबर शाखेला पूर्णपणे माहिती असतानासुध्दा त्यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सट्टा चालवणारा चौरसिया नावाची व्यक्ती जनतेची लुट करीत असून त्यास अटक करुन त्याची सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करण्याबाबत व बेकायदेशीरपणे सुरु असलेल्या ऑनलाईन सट्ट्यास मदत करणाऱ्या पोलीस यंत्रणेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मुंबई वगळता इतर शहरात गेम किंग इंडिया या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरिकांची दररोज कोटयवधीची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब उघडकीस आलेली नाही. तथापि, गेम किंग इंडिया या नावाने ऑनलाईन सट्ट्याबाबत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ११ गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) अचल किंवा आचल किंवा अंचल चौरासिया हा आरोपी किंवा "गेम किंग इंडिया" या मार्फत चालविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सट्टयाविरुध्द बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील विविध पोलीस ठाण्यांकडून वेळोवेळी कारवाई करण्यात आली असून, त्यास पोलीस यंत्रणांकडून मदत केल्याचे वा करण्यात येत असल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राधेकृष्ण पार्क हौसिंग सोसायटी, पिसवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील नागरिकांकडून वसूल करण्यात आलेला कर रद्द करण्याबाबत

**(५४) * ४३७१० श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसवली (ता.कल्याण पूर्व, जि.ठाणे) येथील राधेकृष्ण पार्क हौसिंग सोसायटी व गावातील नागरिकांना एम.आय.डी.सी. मार्फत पाणीपुरवठा केला जात असून महानगरपालिकेमार्फत वीज, पाणी, रस्ते यापैकी कोणत्याही सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या नसतांनाही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत सदर रहिवाश्यांकडून वास्तव्य कर वसूल करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पिसवली गावातील नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असून महानगरपालिकेने सदर कर रद्द करुन आकारण्यात आलेली रक्कम नागरिकांना परत देण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पिसवली गावातील राधेकृष्ण पार्क सोसायटीकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी घेऊन महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा केला जातो तर वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य वीज कंपनीकडून केला जातो.

या गावातील रस्ते महापालिकेमार्फत विकसित करण्यात येत आहेत.

२७ गावांमधील पिसवली गांव हे दिनांक ०१ जून, २०१५ पासून महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्याने तेथील कर वसुली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे तेथील नागरिक व लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे.

(३) २७ गावांची कर आकारणी कमी करण्याबाबत दिनांक १९/०४/२०१८ रोजी महानगरपालिका सर्वसाधारणसभेने महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व करांच्या २०% प्रमाणे कर आकारणी करून दुरूस्तीची बिले निर्गमित करण्याबाबत ठराव क्र.१२ पारीत केलेला आहे.

तथापि, सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अ मधील तरतूदीच्या विसंगत असल्याने त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

सदर ठराव विखंडनासाठी दिनांक १९/०६/२०१८ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्यावर पुढील नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शहरी व ग्रामीण भागात बेकायदेशीररित्या हुक्का पार्लर सुरू असल्याबाबत

**(५५) * ४१९८८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शहरी व ग्रामीण भागात बेकायदेशीररित्या हुक्का पार्लर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हुक्का पार्लरमुळे युवा वर्ग व्यसनाधिन होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार मागणी करुनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर हुक्का पार्लर कायमस्वरूपी बंद करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस : (**१) होय.

(२) व (३) अवैद्य हुक्का पार्लरवर कोट्पा (सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३) कायदयानुसार कारवाई करण्यात आलेली आहे. हुक्का पार्लरवर बंदी आणण्यासाठी सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व व्यापार वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ या विधेयकास विधीमंडळाची मान्यता घेण्यात आली असून, विधानमंडळाच्या संमतीनंतर विधी व न्याय विभागाच्या दिनांक ०६/०४/२०१८ च्या पत्रान्वये सदर विधेयकास मा.राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांच्या सचिवांना विनंती करण्यात आली आहे. मा.राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळाल्यानंतर सदर विधेयकानुसार राज्यात हुक्का पार्लरवर कायमस्वरुपी बंदी येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांकडील निवासस्थाने ताब्यात घेण्याबाबत

**(५६) * ४३६५६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य प्रशासनात कार्यरत असलेल्या सनदी अधिकारी (आयएएस, आयपीएस) यांना शासनाने मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिलेल्या भूखंडावर स्वत:च्या मालकीची निवासस्थाने असूनही किंवा सेवानिवृत्त होवून देखील शासकीय निवासस्थानाचा लाभ घेत असून सवलतीच्या दराने भाडेतत्वावर निवासस्थान ताब्यात ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अधिकाऱ्यांकडील निवासस्थाने ताब्यात घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भाऊचा धक्का ते मांडवा येथे केंद्र शासनाच्या सागरमाला प्रकल्पांतर्गत सागरी मार्गे रो-रो सेवा सुरु करण्याबाबत

**(५७) * ४२४६५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भाऊचा धक्का ते अलिबाग तालुक्यातील मांडवा येथे केंद्र शासनाच्या सागरमाला प्रकल्पांतर्गत सागरी मार्गे रो-रो सेवा सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रा-रो सेवेकरीता मांडवा येथे टर्मिनल बांधण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मांडवा ता.अलिबाग, जि.रायगड येथील रो-रो जेट्टी व ब्रेक वॉटर बांधणे या कामास रुपये १३५.२९ कोटी इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर कामाची निविदा प्रकिया पूर्ण करुन कामाचे कार्यादेश दिनांक १५/०७/२०१६ रोजी देण्यात आले असून, कामाची मुदत दिनांक १४/०७/२०१८ पर्यंत आहे. सद्य:स्थितीत लाटरोधक भिंत रो-रो जेट्टी, प्रवासी टर्मिनल इमारत व तत्सम सुविधांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात प्लास्टिक कचरा नष्ट करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५८) * ४३३८६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्लास्टिक बंदी केली असली तरी नागपूर शहरात दररोज निघणाऱ्या १२०० टन कचऱ्यापैकी १२ ते १५ टक्के म्हणजे १५० मेट्रिक टन कचरा हा प्लास्टिकचा असल्यामुळे पारंपारिक जलस्त्रोत नष्ट होण्याच्या मार्गावर असून शहरातील नाले, भूमिगत गटारे प्लास्टिकमुळे बंद होवून पर्यावरणावरही त्याचा विपरित परिणाम होत असून नागपूर शहरात प्लास्टिक नष्ट करण्यासाठी यंत्रणाच उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात गोळा होणारा कचरा भांडेवाडीत साठविण्यात येत असून महानगरपालिकेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ८०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे टार्गेट ठेवलेल्या हजर नावाच्या कंपनीला नियुक्त केले होते, परंतु सन २०१२ मध्ये सदर प्लांटमध्ये आग लागून तो बंद पडल्यामुळे भांडेवाडीत सर्वत्र कचऱ्याचे ढिगारे साचून दुर्गंधी पसरत असल्यामुळे जनतेचे आरोग्यही धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्लास्टिक बंदीच्या नावावर ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक बॅगच्या विक्रीवर बंदी घातली असूनही कुठलीच संस्था प्लास्टिक बंदीला गांभीर्याने घेत नसल्याने मार्केटमध्ये सर्रास प्लास्टिकची खरेदी-विक्री सुरू असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरातून दररोज ११०० ते १२०० मे.ट. घनकचऱ्याची निर्मिती होते. त्यापैकी सध्या २०० टन मिश्र (प्लास्टीक मिश्रीत) कचऱ्याचे विलगीकरण करुन त्यातून कंम्पोस्ट व आरडीएफची निर्मिती करण्यात येत आहे. ऑपरेटरद्वारे सदरचे कंम्पोस्ट राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर कंपनीला आणि आरडीएफ नागपूर परिसरातील विविध उद्योगांना त्यांचे बॉयलरसाठी इंधन म्हणून विक्री केले जाते.

निव्वळ प्लॅस्टिकवर प्रक्रियेची महानगरपालिकेकडे सध्या व्यवस्था नसली तरीही जमा झालेल्या कचऱ्याची संपूर्णपणे विल्हेवाट लावण्यासाठी बायोमायनिंग प्रकल्पाव्दारे, प्लॅस्टीक व आरडीएफ वेगळे करुन हे इंधन चंद्रपूर येथील सिमेंट प्रकल्पाला देण्यासाठी मे.झिग्मा ग्लोबल एनव्हायरल सोल्यूशन प्रा.लि. या एजन्सीची निवड करण्यात आलेली आहे.

(२) हंजर कंपनीच्या प्लान्टला आग लागून तो काही काळ बंद होता हे खरे आहे. मात्र साठलेल्या कचऱ्यावर नियमित फवारणी केली जाते, त्यामुळे डेपो लगतच्या परीसरात दुर्गंधी नसते, असे नागपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ८०० मे.ट. कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याचे कामासाठी नियमित निविदा प्रक्रियेद्वारे एजन्सीची निवड करण्यात आली असून, एजन्सीसोबत सवलत करारनामा (Concession Agreement) करण्यात आला आहे.

सदर प्रकल्प नोव्हेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याकरीता महानगरपालिकेने नियोजन केले आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या प्लास्टीक बंदीच्या निर्णयाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकास्तरावर पूर्ण क्षमतेने कार्यवाही सुरु आहे.

यासंदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये बंदी असलेल्या प्लॅस्टीकचा वापर थांबविण्याच्यादृष्टीने, महानगरपालिकेने १२० कर्मचारी या मोहिमेसाठी नियुक्त केले आहेत.

आतापर्यंत महानगरपालिकेमार्फत १७९ प्रकरणात २७५७ किलो प्लास्टीक जप्त करण्यात आले असून, यापोटी रुपये ८.३० लक्ष इतका दंड वसूल केलेला आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आठवीचा वर्ग नसल्याने सुमारे एक लाख विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याबाबत

**(५९) * ४३०६१ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या बहुतांश शाळामध्ये आठवीचा वर्ग नसल्याने सुमारे एक लाख विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचे माहितीच्या अधिकारांतर्गत देण्यात आलेल्या माहितीच्या आधारे माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाला आठवीपर्यंत मोफत शिक्षण अनिवार्य असतानाही महानगरपालिकेच्या हजारो शाळेत आठवीचे वर्ग नसल्याचे कारण काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १ ली ते ७ वी पर्यंतच्या ३६३ शाळा होत्या. त्यापैकी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये १०३ शाळांमध्ये ८ वीचे वर्ग नव्याने सुरु करण्यात आले असून उर्वरित २६० शाळांमध्ये ८ वीचे नवीन वर्ग सुरु करण्याची आवश्यकता नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत महानगरपालिकेच्या ४९६ शाळांमध्ये ८ वीचे नवीन वर्ग उघडण्यात आले आहेत.

त्यामुळे ८ वीचा वर्ग नसल्याने विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याची बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ अन्वये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २०१४-१५ पासून सुरु करण्यात आलेल्या ८ वीच्या वर्गांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| शैक्षणिक वर्ष | शाळांची संख्या | नवीन वर्ग संख्या |
|---|---|---|
| २०१४-१५ | १०० | १०० |
| २०१५-१६ | ११६ | १५२ |
| २०१६-१७ | १५३ | १५३ |
| २०१७-१८ | २४ | २४ |
| २०१८-१९ | १०३ | १०३ |
| एकूण | ४९६ | ५३२ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेच्या मेट्रो व रस्त्यांच्या कामांना विलंब होत असल्याबाबत

**(६०) * ४२४३७ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीची तीन महिन्यापासून बैठक न झाल्याने मेट्रो व रस्त्यांच्या कामात अडथळा ठरणाऱ्या वृक्षतोडीला परवानगी न मिळाल्याने सदर कामांना विलंब होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मेट्रो व रस्त्यांच्या कामांना अडथळा ठरणाऱ्या वृक्षतोडीला त्वरीत परवानगी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मेट्रो प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या ११०६ वृक्षांच्या संदर्भात नियमोचीत तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस देण्यात आली होती.

विहित कालावधीत याबाबत कोणतेही आक्षेप/हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त झाले नाहीत असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

संबंधित ठिकाणचे वृक्ष काढणे/पुनर्रोपण करणे याबाबतचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण समितीच्या दिनांक २२/०६/२०१८ रोजीच्या बैठकीत मान्य झाला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६१) * ४१७९२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ७८१ पदे रिक्त असल्याचे माहितीच्या अधिकारामार्फत माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून महानगरपालिकेतील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार ८९०० आवश्यक पदे असून महानगरपालिकेच्या सेवेत फक्त ८,११९ शिक्षक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असलेल्या शाळांमधील पटसंख्येनुसार प्रशिक्षकांची ९६१९ पदे आवश्यक आहेत. तथापि, ९७२८ शिक्षक कार्यरत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमांच्या (इयत्ता १ ली ते १० वी) शाळांमध्ये ३१५ अतिरिक्त प्रशिक्षकांची व मुंबई पब्लिक स्कुल (इंग्रजी माध्यम) (इयत्ता छोटा शिशु ते १० वी) मध्ये ११३ प्रशिक्षकांची आवश्यकता आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असलेल्या इंग्रजी माध्यम व मुंबई पब्लिक स्कूल (इंग्रजी माध्यम) मधील प्रशिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांसाठी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६२) * ४१९९५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काची घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर गिरणी मालकांनी एक तृतीयांश जमीन म्हाडा व मुंबई महापालिकेला दिली असूनही गत तीन वर्षात शासनाने गिरणी कामगारांसाठी एकही घर बांधले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील अकरा गिरणी मालकांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अद्याप एक इंचही जमीन गिरणी कामगाराच्या घरासाठी दिली नसून गिरण्यांच्या जमिनीवर इमारती उभारण्याचा कामगारांचा हक्क डावलून भूखंड गिळंकृत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील चार गिरण्यांमध्ये संयुक्त भागीदारी योजनेंतर्गत ६ हजार बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार होते पण गिरण्यांच्या जागेवर इतर व्यवसाय सुरू करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यामुळे गिरणी कामगार संघर्ष समितीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा

त्यादरम्यान मुख्य सचिवांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले असून गिरणी कामगारांनीही घरासाठी सुमारे १ लाख ७५ हजार अर्ज म्हाडाकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या तसेच गिरणी कामगारांच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही. म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार गिरणी कामगार प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सद्य:स्थितीमध्ये ८ गिरण्यांच्या जमिनीवर योजना प्रगतीपथावर आहे. ८ गिरण्यांपैकी ६ गिरण्यांचे काम पूर्ण झाले असून गिरणी कामगारांसाठी एकूण २६३४ सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच उर्वरित २ गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी ३८६७ सदनिका बांधण्याचे प्रगतिपथावर आहे. दिनांक ०९/०५/२०१६ रोजी गिरणी कामगारांसाठी २६३४ सदनिकांची सोडत काढण्यांत आली आहे.

(२) नगरविकास विभागाकडून प्राप्त माहितीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण ५८ गिरण्यांचा समावेश आहे. त्यातील सदरहू ११ गिरण्यांच्या संदर्भात पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर नाही. सदर ११ गिरण्यांपैकी ९ कापड गिरण्या ह्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या असून त्यापैकी युनायटेड मिल नं. ६ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक प्रस्तावित आहे. सदर जागा स्मारकासाठी आरक्षित झालेली आहे. राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडील गिरण्यांचा विचार करता म्हाडाला देय असलेली जागा महामंडळाकडून इंडीया युनायटेड मिल क्र. ४ मध्ये देण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचा प्रस्ताव महापालिकेकडे कार्यवाहीमध्ये आहे. उर्वरित ब्रॅडबरी व रघुवंशी या दोन खाजगी मिलचे प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाहीत. सबब, ११ कापड गिरण्यांमधून गिरणी कामगारांच्या घरांसाठी जमीन अद्याप देण्यात आलेली नाही. यापूर्वी राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाने इतर मिलमध्ये जागा दिली आहे.

(३) व (४) मा.मुख्य सचिव कार्यालयाच्या अहवालानुसार गिरणी कामगार संघर्ष समितीचे जानेवारी, २०१८ मध्ये मा.मुख्य सचिव अथवा त्यांच्या कार्यालयाकडे निवेदन केल्याचे आढळून येत नाही.

म्हाडाच्या अहवालानुसार सन २०१०-२०११ मध्ये गिरणी कामगारांचे अर्ज भरण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत ॲक्सिस बँक व सारस्वत बँकेत एकूण १,४८,७११ अर्ज प्राप्त झाले असून तद्नंतर मा.उच्च न्यायालय यांनी याचिका क्र. २३८४ सन २०१५ च्या दिनांक ३०/११/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ज्या गिरणी कामगार/वारसांनी सन २०१०-११ मधील मोहिमेच्या अनुषंगाने अर्ज सादर करुन शकले नाहीत अशा गिरणी कामगार/वारस यांना नव्याने म्हाडाच्या संकेत स्थळावरुन Online अर्ज सादर करण्यासाठी जाहिरातीव्दारे दिनांक २६/०५/२०१७ ते दिनांक २७/०६/२०१७ व मुदतवाढ दिनांक २८/०६/२०१७ ते दिनांक ३१/०७/२०१७ पर्यंत मोहिम राबविण्यात आली असून सदर मोहिमेंतर्गत एकूण २५४६१ अर्ज प्राप्त झाले आहेत असे एकूण १७४१७२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेट्रो-३ प्रकल्पात बाधित होणाऱ्या गिरगाव (मुंबई) येथील क्रांतीनगर चाळीतील कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(६३) * ४३५९३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरगावामधून जाणारा मेट्रो प्रकल्पासाठी गिरगाव येथील क्रांतीनगरच्या १०३ कुटुंबांना एमएमआरडीएकडून जागा सोडण्यासाठी नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरगावातून जाणाऱ्या मेट्रो-३ प्रकल्पात बाधित होणाऱ्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी नियोजन न करताच त्यांना जागा सोडून जाण्याची नोटीस देण्यात आल्यामुळे प्रकल्पबाधित कुटुंबांनी “रोजच्या मरण्यापेक्षा आम्हाला इच्छामरण द्या” अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

(३) व (४) सदर बाधित इमारतींचा पुनर्विकास बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीच्या (DCR) कलम ३३(७) च्या तरतुदीनुसार त्याच इमारतींच्या जागेवर त्याच ठिकाणी पुनर्विकासाव्दारे केला जाणार असून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सर्वंकष पुनर्वसन आराखडा तयार करण्यात आला आहे. सर्वंकष पुनर्वसन आराखड्यानुसार प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी पुनर्वसन देण्यात येणार आहे.

मेट्रो लाईन ३ प्रकल्पांतर्गत गिरगाव व काळबादेवी स्थानकामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांकरीता पुनर्विकसित इमारती तयार होईपर्यंत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत भाडे देण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मार्फत बाधित प्रकल्पग्रस्तांसोबत तात्पुरत्या पर्यायी पुनर्वसनाकरीता करारपत्र करणेत येत असून सदर करारनाम्यामध्ये बाधित इमारतीच्या जागेचा ताबा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला मिळाल्यापासून ४६ महिन्यांच्या कालावधीमध्ये कायमस्वरूपी देय असलेल्या पुनर्वसनाकरीताच्या सदनिकांचे बांधकाम पूर्ण करून देण्यात येईल अशी तरतूद केली आहे.

गिरगाव व काळबादेवी येथील मेट्रो लाईन-३ या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या क्रांतीनगर इमारतीमधील रहिवाश्यांना सर्वंकष पुनर्वसन आराखड्याची सविस्तर माहिती देण्याकरीता तसेच याबाबत त्यांचे मत जाणून घेण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई यांनी दिनांक १०/०५/२०१८ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये इमारती व रहिवाश्यांबाबतच्या सर्वंकष पुनर्वसन आराखड्यासंदर्भात माहिती देऊन तसेच संबंधित रहिवाश्यांनी पुनर्वसनाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली आहेत.

-----------------

## राज्यातील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नव्या इमारती कौशल्य विकास विभागाने ताब्यात न घेतल्याबाबत

**(६४) * ४१५०२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १७ शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नव्या इमारती गत ५ वर्षापासून तयार असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर इमारतींचा ताबा कौशल्य विकास विभागाने घेतलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त १७ शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारतीचे बांधकामाकरीता ६४ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून उक्त संस्थांची केंद्रे भाड्याच्या इमारतीत सुरु असल्याने भाड्यापोटी वर्षाला २५ लाखांची रक्कम मोजावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारती तयार असतांनाही उक्त केंद्रे भाड्याच्या इमारतीत सुरु ठेवण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांर्तगत एकूण १७ संस्थांच्या बांधकामांपैकी एकूण ७ संस्थांचे हस्तांतरण झालेले आहे. त्यातील १ संस्थेचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे व इतर ६ संस्थांचे भोगवटा प्रमाणपत्राशिवाय हस्तांतरण झाले आहे. उर्वरीत १० संस्थांची बांधकामे अपूर्ण असल्याने त्यांचा ताबा घेण्यात आलेला नाही. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व आवश्यक अभिलेख प्राप्त झाल्यावर इमारतींचा ताबा घेण्यात येईल.
(२) बांधकाम पूर्ण असलेल्या एकूण १७ शासकीय संस्थांपैकी १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ०३ वसतिगृह व ०२ शासकीय तांत्रिक विद्यालये यांच्या बांधकामांसाठी एकूण रूपये ८०५९.२१ लक्ष रक्कम खर्च झाली असून त्यापैकी

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगांव जामोद ही संस्था स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत झाली असून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. ०६ संस्था स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहेत. परंतु अद्याप त्यांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. ०५ संस्था या विभागाच्या इतर शासकीय संस्थेमध्ये कार्यरत आहेत. उर्वरीत ०१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ०१ शासकीय तांत्रिक विद्यालय अशा ०२ संस्था भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत असून या संस्थांकरीता भाड्यापोटी रूपये ३,८९,०२८/- इतका वार्षिक खर्च होत आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वानगाव वसतिगृह, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाडा वसतिगृह, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पेण वसतिगृह या तीन संस्थांच्या इमारतीमधील काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने अपूर्ण ठेवल्याने व आवश्यक ते अभिलेख उपलब्ध न करून दिल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संस्थेच्या इमारती अद्याप या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नाहीत.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतीची कामे अपूर्ण ठेवल्याने व आवश्यक ते अभिलेख उपलब्ध न करून दिल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संस्थेच्या इमारती अदयाप या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संस्था भाड्याच्या इमारतीमध्ये सुरू आहेत.

(४) व (५) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.

-----------------

## मौजे वारुंजी, मुंडे व केसे (ता.कराड, जि.सातारा) येथील विमानतळ विस्तार प्रकल्पग्रस्तांची प्रलंबित देयके देण्याबाबत

**(६५) * ४३४३० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वारुंजी, मुंडे व केसे (ता.कराड, जि.सातारा) येथील विमानतळ विस्तारातील प्रकल्पग्रस्तांची प्रलंबित देयके देण्याबाबत तसेच विमानतळासाठी लागणारी रक्कम ६९,४१,७२,९९० रुपयांची तरतूद करण्यासाठी स्थानिक

लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना वारंवार निवेदने देवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कराड विमानतळाच्या विस्तार/विकासासाठी रुपये ९५.६४ कोटी खर्चास शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली असून आवश्यक भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबतही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस निर्देश दिलेले आहेत.

सद्य:स्थितीत, सदर प्रकरणी निवाड्याची तपासणी करण्याची कार्यवाही भूसंपादन अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे. सदर कार्यवाही पूर्ण होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिठी नदीच्या संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी गठीत केलेल्या तज्ञ समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत

**(६६) * ४२३१३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने “नॅशनल वॉटर मॉनिटरिंग प्रोजेक्ट” अंतर्गत दर महिन्याला करण्यात येणाऱ्या मिठी नदीच्या पाण्याच्या गुणवत्ता तपासणीत गत तीन महिन्यात नदीच्या प्रदूषणात मर्यादित प्रमाणापेक्षा वीसपट वाढ झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिठी नदीच्या संवर्धनासाठी गठीत केलेल्या तज्ञ संस्थाच्या समितीने नदीच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांचा अहवाल न्यायालयाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने मिठी नदीच्या संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी गठित केलेल्या तज्ज्ञ समितीने त्यांचा अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयास सादर केला असून मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधित संस्थांना त्यांचे अभिप्राय सादर करण्याचे निदेश दिलेले आहेत. तज्ज्ञ समितीने सुचविलेल्या अल्प व दिर्घकालीन उपाययोजना लागू करण्यासंदर्भात प्राधिकरणाच्यास्तरावर सविस्तर अभ्यासाची आवश्यकता आहे. त्याबाबतचा अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पर्यावरण विभागास सादर केला असून तो तपासण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई महानगरात मुलींच्या अपहरणात वाढ होत असल्याबाबत

**(६७) * ४१५२० श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरात सन २०१७ पर्यंत ५०५६ मुलींचे अपहरण आणि बेपत्ता होण्याचे गुन्हे दाखल झाल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी किती मुलींचा शोध लावण्यात आला असून सदर मुलींच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सन २०१४ ते एप्रिल, २०१८ या कालावधीत १८ वर्षाखालील एकुण ५४३६ मुलींचे अपहरण झाले असून अद्यापपावेतो ५०३५ मुली मिळून आल्या आहेत.

हरविलेल्या व्यक्तिंचा तपास करण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपध्दती (SOP) तयार करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२ (बचपन बचाव आंदोलन) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या मुल/मुली संदर्भात अपहरणांचा गुन्हा दाखल करण्यात येतो.

हरविलेल्या मुलांच्या संदर्भात खालील वेबसाईट्स कार्यान्वित आहेत.

१) www.trackthemissingchild.gov.in

२) www.mumbaipolice.gov.in

३) www.shodh.gov.in

हरविलेल्या लहान मुलांचा शोध घेण्याकरीता जुलै, २०१५ ते जुलै, २०१७ या कालावधीत ऑपरेशन मुस्कान व ऑपरेशन स्माईलच्या एकूण ६ शोध मोहिम राबविण्यात आले आहेत.

तसेच, महिला व बालविकास विभागाकडून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या अधिनियमातील तरतूदींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. बाल कल्याण समितीकडून बालकांची प्रकरणपरत्वे चौकशी करण्यात येऊन व बालकांचे हितास प्राधान्य देण्यात येऊन निर्णय घेण्यात येतो. तसेच, विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी ४३ शासकीय बालगृहे कार्यरत असून १८ वर्षावरील मुलींसंदर्भात राज्यातील संरक्षणगृहे/ राज्यगृहांमधून या मुलींना सेवा पुरविण्यात येऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड शहरात स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत लाभार्थ्यांनी शौचालय बांधकामास विलंब केल्याबाबत

**(६८) * ४२५९३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरात स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालयासाठी अनुदान दिले जात असून सदर ठिकाणी केलेल्या सर्वेक्षणात ५६ नागरीकांनी नगरपरिषद अधिकाऱ्यांच्या संगनमताने शौचालय न बांधताच पहिला हप्ता घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेतील स्वच्छता निरीक्षक दोषी नागरीकांवर कारवाई न करता अर्थपूर्ण संगनमत करुन मुख्याधिकारांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे सर्वेक्षणाच्या अभावी आजही शेकडो शौचालये कागदावरच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकारी व नागरिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पात्र ठरवलेल्या लाभार्थ्यास शौचालय बांधकामासाठी निधी वितरणाचे टप्पे ठरवून देण्यात आले आहेत. त्यानुसार, पहिला हप्ता हा बांधकाम सुरू करण्यापूर्वी उपलब्ध करून देण्यात येतो. त्यानुसार बीड शहरातही २५९२ अर्जदारांचे अर्ज मंजूर करून त्यांना शौचालय बांधकामाचा पहिला हप्ता बांधकाम सुरू करण्यापूर्वी देण्यात आला आहे.

या २५९२ पैकी १९९० शौचालयांची कामे पूर्ण झाली असून, ५६६ शौचालयांची कामे प्रगतीपथावर आहेत.

पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेल्या लाभार्थ्यांपैकी ३६ लाभार्थ्यांच्या घरी भेट दिली असता त्यांनी शौचालयाचे बांधकाम सुरू न केल्याचे निदर्शनास आले आहे. या ३६ लाभार्थ्यांना बांधकाम सुरू करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील सिग्नल बिघाड झाल्यामुळे शहरातील मुख्य चौकात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(६९) * ४२२१५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील वाहतूक सिग्नलमध्ये बिघाड झाल्यामुळे शहरातील मुख्य चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून वाहतूक पोलीस याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) नांदेड शहर हे दाट लोकवस्तीचे शहर असून शहरातील मुख्य रस्ते प्रशस्त नाहीत. मुख्य रस्त्यांवर आवश्यक ती पार्किंगची तसेच वाहतूक वळविण्यासाठी योग्य प्रमाणात व्यवस्था नाही. वाहतूक समस्येवर मात करण्यासाठी नांदेड शहरात नांदेड शहर विभाग व इतवारा नांदेड विभाग अशी दोन विभागात वाहतूक शाखेची विभागणी करुन योग्य प्रमाणात पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

राज कॉर्नर ते वजिराबाद ते बर्की चौक हा एकच मुख्य रस्ता असल्याने तसेच त्याच रस्त्यावर अनेक शासकीय कार्यालये, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्टेशन, शासकीय व खाजगी दवाखाने इ. आहेत. तसेच याच रस्त्याने मोर्चे, मिरवणूका, अंत्ययात्रा निघत असल्यामुळे काही काळ वाहतूकीची समस्या निर्माण होते. मात्र शहर वाहतूक शाखेमार्फत वेळीच वाहतूकीस योग्य वळण देऊन वाहतूक सुरळीत करण्यात येते.

(२) नांदेड शहरातील मुख्य चौकात महानगरपालिकेकडून वाहतूक सिग्नल बसविण्यात आलेले आहेत. तसेच मुख्य चौरस्त्यावर व महत्वाच्या ठिकाणी शहर वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येत आहेत. शहरात एकूण १५ सिग्नल असून त्यापैकी २ सिग्नल सध्या बंद आहेत. त्यापैकी एक सिग्नल केबल जळाल्यामुळे बंद असून तो लगेचच सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच दुसरा सिग्नल राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे काढण्यात आला होता, त्याठिकाणी नविन सिग्नल बसविण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येत आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द मोटार वाहन कायद्यान्वये पुढीलप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

| सन | खटले दाखल | दंड वसूली (रुपये) |
|---|---|---|
| २०१७ | २३,३५४ | ८७,०२,३००/- |
| २०१८ (मे पर्यंत) | १२,२२५ | ३०,०४,५००/- |

शहराचा वाढीव क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु असून त्यामध्ये मुख्य रस्त्यांची रुंदी वाढविणे, पार्किंगची व्यवस्था करणे, चौरस्ते प्रशस्त करणे, पर्यायी मुख्य रस्ता तयार करणे इ. कामे प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिलेल्या प्रकरणात गैरप्रकार व अनियमितता आढळल्याबाबत

**(७०) * ४३५५५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेवानिवृत्तीच्या अखरेच्या कालावधीत मान्यता दिलेल्या १३७ प्रकरणांपैकी ३३ प्रकरणात गैरकारभार व अनियमितता आढळून आल्याने सदर प्रकरणांची अतिरिक्त आयुक्त कोकण विभाग यांच्याकडून चौकशी करण्याचे आदेश दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्याने जुहूतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत दोन अलिशान सदनिका मिळविण्यासाठी पत्नीला विकासकासोबत भागीदार करुन सदर गैरव्यवहार प्रकरणातील महत्त्वाची फाईल प्राधिकारणातून गहाळ झाल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दीड महिन्यानंतरही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने अनियमितता आढळून आलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची मान्यता त्वरीत रद्द करुन उक्त प्रकल्प म्हाडातर्फे राबविण्याबाबत निर्णय घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त कोकण यांच्यातर्फे चौकशी करण्यात येत नसून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणस्तरावर याची तपासणी करण्यात येत आहे.

(२) व (३) सन २००७ मध्ये पूर्ण झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतची संबंधित प्रकरणाची प्राधिकरणाची नस्ती प्राधिकरणाच्या अभिलेख कक्षात उपलब्ध नसल्याने, निर्मल नगर पोलीस ठाणेमध्ये दैनंदिनी क्रमांक २५९९/१७ दिनांक ३०/११/२०१७ अन्वये, नस्ती गहाळ झाल्याची तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाव्दारे करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न भाग २ मधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटक व विक्री घटक पूर्ण झालेले असल्याने योजना रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील स्मार्ट सिटी योजनेचे काम सुरु करण्याबाबत

**(७१) * ४२५६८ श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंरगाबाद शहरातील स्मार्ट सिटी योजनेकरीता केंद्र शासनाने रुपये २८३ कोटीचा निधी दिला असूनही सदर निधीचा एक रुपया ही खर्च करण्यात आला नसून स्मार्ट सिटीची योजनेंतर्गत एकदा ही बैठक घेण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार स्मार्ट सिटी योजनेचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस : (**१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत औरंगाबाद शहरासाठी केंद्र व राज्य शासन मिळून एकूण रुपये २८५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

औरंगाबाद शहरातील स्मार्ट सिटी प्रकल्पांकरीता आतापर्यंत रुपये २.२६ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत संचालक मंडळाच्या आतापर्यंत एकूण चार बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

विशेष उद्देश वहनास सर्व प्रशासकीय तसेच वित्तीय अधिकार देण्यात आले असून प्रकल्प कालमर्यादेत राबविण्याच्या अनुषंगाने प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत

**(७२) * ४१५५३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा पदवीधर अंशकालीन कर्मचारी समन्वय समितीने कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी व विना अट शासकीय सेवेत सामावून घेण्याकरीता गत ८ वर्षापासून शासनाकडे तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अकोला यांच्याकडे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत घेण्यासाठी समिती तयार केली असून समितीची प्रथम बैठक दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी संपन्न होऊनही कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेत घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा मागील १५ वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याकरीता तसेच अंशकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण

ठरविण्याकरीता शासन निर्णय दिनांक १६/०२/२०१८ अन्वये एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या दिनांक ६ मार्च, २०१८ व दिनांक २२ मे, २०१८ अशा दोन बैठका पार पडलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रोळी, मुंबई येथे पुर्व द्रुतगती महामार्ग ओलांडताना भरधाव मोटारीने महिलांना उडविल्याबाबत

**(७३) * ४१४८१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी, मुंबई येथे पोलीस भरतीसाठी चाचणी देऊन पूर्व द्रुतगती महामार्ग ओलांडताना भरधाव मोटारीने चार महिलांना उडविल्याची घटना दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भीषण अपघातात चारही महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांना महात्मा फुले रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोषी मोटरचालकास अटक करण्यात आली आहे काय, त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमी महिलांना शासनामार्फत कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

दिनांक ८ मे, २०१८ रोजी ११.०० चे सुमारास विक्रोळी येथे पोलीस भरतीची मैदानी चाचणी देवून पुर्व द्रुतगती महामार्ग ओलांडतांना भरधाव मोटारने चार महिलांना उडविल्याची घटना घडली आहे.
(२) सदर अपघातात फक्त एक महिला गंभीर जखमी झाली होती तर तीन महिला किरकोळ जखमी झाल्या होत्या. त्यांना प्रथम महात्मा फुले रुग्णालयात तर नंतर पुढील उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(३) दोषी मोटारचालकास दिनांक ८ मे, २०१८ रोजी अटक करण्यात आली होती. त्याच्यावर विक्रोळी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६०/१८, भा.दं.वि. कलम २७४९, ३३८, ३३७ सह १८४ मो.वा.का. सह गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जखमी महिलांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील गटई कामगारांचे परवाने मुलींच्या नावे हस्तांतरीत करण्याबाबत

**(७४) * ४१२८३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील गटई कामगारांचे परवाने मुलींच्या नावे हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार आतापर्यंत किती गटई कामगारांच्या मुलींना फायदा झाला आहे तसेच उक्त निर्णय राज्यातील अन्य शहरातील महानगरपालिका हद्दीत लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१३ (अ) (ब) अन्वये देण्यात आलेली अनुज्ञापत्रे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञापत्रधारकाच्या मुलींच्या (विवाहित/ अविवाहित/घटस्फोटित/विधवा) नावे हस्तांतरीत करण्याबाबतचा निर्णय महानगरपालिकेमार्फत दिनांक ०७/०९/२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२१७ गटई/अनुज्ञापत्रधारकांच्या मुलींना सदर निर्णयाचा फायदा होऊ शकणार आहे.

तथापि, अन्य महानगरपालिकेत या निर्णयाची कशा प्रकारे अंमलबजावणी करता येईल याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहाराची चौकशी सीआयडीमार्फत करण्याबाबत

**(७५) * ४२०४१ ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्वास पाटील यांच्या कार्यकाळातील ३३ प्रकरणात झालेल्या हजारो कोटी रुपयाच्या गैरव्यवहाराची विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सुरू असलेली चौकशी न थांबविता तशीच सुरु ठेवावी आणि सीआयडी मार्फतही स्वतंत्र चौकशी करुन त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी गृहनिर्माण विभागाच्या अप्पर मुख्य सचिव यांना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी जाणीवपूर्वक दिरंगाई केली असून गैरव्यवहार झालेल्या रकमेची वसुली करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, उक्त गैरव्यवहाराबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, या अहवालात कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत व याबाबत शासनाने चौकशी अहवालानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय. हे खरे आहे.

अर्थसंकल्पिय अधिवेशन सन २०१८ मध्ये उपस्थित करण्यात आलेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र.११२२६८ च्या अनुषंगाने मा.विधानमंडळामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी अशा आशयाचे आश्वासन दिले व सदर आश्वासनाच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिनांक २१/०४/२०१८ रोजी अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांना पत्र पाठविले आहे.

(२) व (३) आश्वासनाच्या अनुषंगाने आश्वासन पूर्तीबाबत गृहनिर्माण विभागाद्वारे विहित विवरणपत्रातील अहवाल विधानमंडळास सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या महिन्यामध्ये निकाली काढलेल्या १३६ प्रकरणांबाबत प्रथम चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यामधील ३३ प्रकरणांमध्ये सकृतदर्शनी अनियमितता आढळल्यामुळे त्यांची चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/१०/२०१७ रोजी समिती गठीत केली आहे. सदर समिती सर्व संबंधितांना नि:पक्षपातीपणे सुनावणी देवून चौकशी करीत असून सदर चौकशी अंतिम टप्प्यात असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला, मुंबई येथील १८ हॉटेल्स/गेस्टहाऊसने अग्निसुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(७६) * ४१३७६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला, मुंबई येथील १८ हॉटेल्स तसेच गेस्ट हाऊसच्या मालकांनी अद्याप महानगरपालिकेच्या अग्निशमन दलांकडून अग्निसुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेस माहिती अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जासोबत जोडलेल्या यादीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने तपासणी केली असता कुर्ला विभागातील १७ हॉटेल्स / गेस्टहाऊस यांनी अद्‌याप महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून अग्निसुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक प्रमाणपत्रांची पुर्तता न केल्याचे निदर्शनास आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) कुर्ला विभागातील अग्निसुरक्षा प्रमाणपत्र न घेतलेल्या १७ हॉटेल्स/गेस्टहाऊसपैकी १५ आस्थापनांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये नोटीस देण्यात आली असून २ आस्थापना तपासणी दरम्यान बंद आढळून आल्या आहेत.

नोटीस दिलेल्या आस्थापनांना अग्निसुरक्षा उपाययोजनांची पुर्तता करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी असून त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(७७) * ४१७५९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ सन २०१९ च्या डिसेंबर महिन्यात कार्यान्वित होईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी करुनही सदर विमानतळाचे काम संथगतीने सुरु असून सन २०१९ मध्येही उक्त विमानतळ पूर्ण करण्याचे उद्दीष्ट संपन्न होणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करुन ते पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कामाबाबतची सदयस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्त्वावर (पी.पी.पी.) ग्रीन फिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय बोली प्रक्रियेच्या निविदा टप्प्यातील उच्चतम बोलीधारक मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टस प्रा.लि. यांची सवलतधारक म्हणून निवड करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ०८/०१/२०१८ रोजी सवलतधारक व राज्य शासन यांच्या दरम्यान विविध करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एक धावपट्टी व परिचलासाठी लागणाऱ्या महत्त्वाच्या सुविधांसह डिसेंबर, २०१९ पूर्वी पूर्ण करण्याचे निश्चित केले असून त्यानुषंगाने ३ भागात विकासपूर्व कामे एप्रिल, २०१७ मध्ये सुरु करण्यात आली आहेत. आजमितीस २४ टक्के भूविकासाचे काम प्रथम टप्प्यात पूर्ण झालेले आहे. भूविकासाचे संपूर्ण काम डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत वसाहत अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(७८) * ४१६३४ श्री.प्रसाद लाड, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापालिकेच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन विभागातील कामाचे विकेंद्रीकरण सन २००७ मध्ये होवून झोपडपट्टी नागरी सुविधांची कामे संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, मुंबईतील झोपडपट्टीतील नागरी सुविधांप्रमाणेच तेथील शुल्क वसुली, अनधिकृत बांधकाम नियंत्रण आदी स्वरूपाची कामे करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एक वसाहत अधिकारी नियुक्त करावे असे आदेश तत्कालीन आयुक्त यांनी देऊनही वसाहत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षेत्रिय कार्यालयांतर्गत वसाहत अधिकारी नसल्यामुळे गत दहा वर्षात किती झोपड्या उभ्या राहिल्या, तसेच अनधिकृत बांधकामे किती झाली व सेवा शुल्क वसुलीची थकबाकी किती आहे, याबाबतची माहिती एकत्रितरित्या उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांतर्गत वसाहत अधिकारी नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील झोपडपट्टीमधील नागरी सुविधांची कामे सद्य:स्थितीमध्ये संबंधित विभाग कार्यालयाच्या परिरक्षण खात्यामार्फत करण्यात येतात.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वसाहत झोपडपट्टी सुधारणा विभागांतर्गत वरिष्ठ वसाहत अधिकारी व वसाहत अधिकारी यांची अनुक्रमे ६ व ३६ पदे मंजूर असून अनुक्रमे ६ व २८ पदे कार्यरत आहेत.
(३) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतूद व महानगरपालिकेचे दिनांक १२/०४/२०१३ चे परिपत्रकानुसार, अतिक्रमण प्रतिबंध व निष्कासन ही जबाबदारी प्रामुख्याने सहाय्यक आयुक्त व पदनिर्देशीत अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

माहे एप्रिल, २०१८ अखेरपर्यंत रुपये १८६.३५ कोटी शुल्क वसुल करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनचोरीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत

**(७९) * ४२०८४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाहन चोरीची तक्रार नोंदविण्यासाठी वेबसाईट व मोबाईल ॲप सुरु करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षात सदर वेबसाईटवर २ हजार २५४ ऑनलाईन तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी ३४१ तक्रारी पुढील कारवाईसाठी स्थानिक पोलिसांकडे वर्ग करण्यात आल्या नसून ९२७ प्रकरणांमध्ये एफआयआर देखील दाखल झालेले नाहीत तसेच वाहन चोरीच्या एकूण २५ हजार २६५ गुन्ह्यांपैकी फक्त २ हजार ६७ प्रकरणांचा छडा लागला असून २१ हजार ९९६ प्रकरणे प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून वाहन चोरीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गु.अ.वि.मार्फत केवळ वाहन चोरी तक्रारी नोंदण्याविषयीची संगणक प्रणाली व मोबाईल ॲप्लीकेशन सुरू करण्यात आलेले नाही. परंतु नागरीकांनी महाराष्ट्र राज्य पोलीस सीसीटीएनएसच्या सीटीझन पोर्टल (www.mhpolice.maharashtra.gov.in) तसेच मोबाईल ॲप्लीकेशन व्दारा, ई-तक्रार नोंदणीमध्ये वाहन चोरीच्या तक्रारी नोंदविल्यास तक्रारदारास पोलीस स्टेशनला बोलावून रितसर गुन्हा दाखल करण्यात येतो.

(२) महाराष्ट्र राज्यात वाहन चोरीचे जानेवारी, २०१७ ते डिसेंबर, २०१७ मध्ये २२८६३ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ५६२७ गुन्हे उघडकीस आले असून १०५२२ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत तसेच जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ पर्यंत १००७४ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १९७८ गुन्हे उघडकीस आले असून ८४०७ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(३) वाहन चोरीच्या प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत पोलिसांकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

i. सर्व प्रथम वाहनचोरी करणारे पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगारांचा तपास करुन ज्यावेळेस वाहन चोरी झाली त्यावेळेस रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या हालचाली कोणत्या ठिकाणी होत्या त्यावरुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.

ii. पोलीस स्टेशन हद्दीत अचानक नाकाबंदीचे आयोजन करुन त्यामध्ये संशयीत वाहने व त्यांची कागदपत्रे तपासली जातात.

iii. खबऱ्यांमार्फत वाहन चोरीचे गुन्हे करणाऱ्या व्यक्तींची माहिती प्राप्त केली जाते.

iv. प्रत्येक पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या वाहन चोरीच्या गुन्हयासंदर्भात व बेवारस स्थितीत आढळून आलेल्या वाहनांबाबत माहिती बिनतारी संदेशाव्दारे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला कळविली जाते.

v. पोलीस स्टेशनला उपलब्ध असलेल्या सीसीटीएनएस प्रणालीव्दारे दाखल झालेल्या वाहन चोरीच्या गुन्हयांची माहिती इतर पोलीस स्टेशनला उपलब्ध होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या ठिकाणी पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत

**(८०) * ४१७१३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे मध्यवर्ती कारागृह अन्य ठिकाणी स्थलांतरित करुन त्याठिकाणी पर्यटन स्थळ विकसित करण्याचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने संमत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे स्थलांतर निश्चित कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे तसेच मध्यवर्ती कारागृहाच्या जागेत विकसित करण्यात येणाऱ्या पर्यटन स्थळाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याठिकाणी पर्यटनाच्यादृष्टीने कोणत्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत,

(३) तसेच, सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास केव्हा प्राप्त झाला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका हद्दीतील मध्यवर्ती कारागृहाच्या वास्तूचे जतन व संवर्धन होऊन ठाण्याचा इतिहास ठाणेकरांसाठी जिवंत करण्याकरीता उक्त ठिकाणी ऐतिहासिक पर्यटन केंद्र तयार करुन, स्वातंत्र्य सैनिकांचे आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांचे या ठिकाणी स्मारक करुन सर्वसामान्यासाठी खुले करावे असा ठराव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २८/०२/२०१८ रोजी पारीत केला आहे.

उपरोक्त ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या ठरावाच्या अनुषंगाने मध्यवर्ती कारागृह, ठाणे यांचे अभिप्राय घेण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नसल्याचे गृह विभागाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी चिंचवड शहरात रिंगरोडचे काम सुरु करण्याबाबत

**(८१) * ४२४५० आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ३९०२५ ला दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी चिंचवड शहरांतील वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी एमएसआरडीसीकडून रिंगरोडचे काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित रिंगरोडला माहे ऑगस्ट, २०११ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत निर्णय घेऊन रिंगरोडसाठी भूसंपादन व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) दिनांक १५ जानेवारी, २०१४ रोजी पायाभुत सुविधा समितीच्या बैठकीत पुणे शहराच्या रिंगरोडचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना अंमलबजावणी यंत्रणा घोषित करण्यात येऊन कामाचे सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे आदेश देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली सचिव समितीने दिनांक ११/०४/२०१७ रोजी बैठकीत निर्णय घेऊन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेतर्फे प्रस्तावित रिंगरोडच्या आखणीत पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळास जोडता येईल अशारितीने फेरबदल करुन त्यास शासनाची मंजूरी घेणेचे आदेशित केले आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळतर्फे रिंगरोडची काही भागात फेर आखणी प्रस्ताव अंतिम करणे प्रगतीत असून आखणी अंतिम झाल्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करण्यात येईल.

-----------------

## पालघर जिल्हयातील आयटीआय केंद्राची दुरवस्था झाल्याबाबत

**(८२) * ४३१९८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील ४ आयटीआय केंद्रे अत्यंत दुरवस्थेत असल्याकारणास्तव बंद पडण्याच्या मार्गावर असून उक्त केंद्राची व्यवस्था पाहण्याकरीता जिल्हा औद्योगिक अधिकारी नेमण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयटीआय केंद्रे बंद होण्याच्या मार्गावर असल्यामुळे जिल्हयातील आदिवासी विद्यार्थांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा अशा चार ठिकाणी औद्योगिक केंद्रे असून संपूर्ण पालघर जिल्ह्यात वसई, पालघर, जव्हार, मोखाडा, पाली, विक्रमगड, वाणगांव आणि तलासरी अशी ७ औद्योगिक केंद्रे आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड तसेच वाडा येथील औद्यागिक प्रशिक्षण संस्था सुस्थितीत सुरु आहेत. तसेच श्री.की.वा.खटावकर हे पालघर जिल्हयाचे "जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी" म्हणून कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

संपूर्ण पालघर जिल्ह्यात वसई, पालघर, जव्हार, मोखाडा, वाडा (पाली येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाडा कार्यरत आहे.) विक्रमगड वाणगाव आणि तलासरी अशी ८ औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे आहेत. तसेच जव्हार, मोखाडा, विक्रमगड आणि वाडा अशा चार ठिकाणच्या औद्योगिक केंद्रांची दुरवस्था झालेली नसून सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुस्थितीत सुरु आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाजीमलंग येथील पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मुलीला गर्भपात करावा लागल्याबाबत

**(८३) * ४१४८६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाजीमलंग येथील एका मुलीचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अपहरण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय चाचणीत सदर मुलगी गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले असताना पोलिसांनी तिच्या कुटुंबियांना याबाबतची माहिती न दिल्यामुळे पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे २४ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधीच्या गर्भाचा गर्भपात करण्याची वेळ या मुलीवर आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने तातडीने सदर अक्षम्य हलगर्जीपणाबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्याची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून हिल लाईन पो.स्टे. येथे गु.र.नं. २०६/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३, ३७६ लहान मुलांचे लैंगिक अत्याचाराचे संरक्षण कायदा, २०१२ चे कलम ४, ८ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

पिडीत मुलीच्या वैद्यकीय तपासणीच्या वेळी तिचे वडील हे प्रत्यक्ष हजर होते. त्यावेळी पिडीत मुलगी ही २२ आठवडे तीन दिवसाची गर्भवती असल्याचे पिडीत मुलीच्या वडिलांना डॉक्टरांनी पोलिसांसमोर सांगितले होते.

दिनांक ०९/०४/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १०९८६/ १८ यामध्ये न्यायालयीन आदेशानुसार गर्भपात करण्यात आला आहे.
(३) व (४) पोलीस अधिकाऱ्याने यामध्ये हलगर्जीपणा केलेला नाही.

अल्पवयीन व पिडीत मुली/महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमधील तपासाचा वेळोवेळी आढावा घेवुन तपास विहीत कालावधीत पूर्ण करण्याबाबत परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## लोकग्राम पुलाचे (ता.कल्याण, जि.ठाणे) नुतनीकरण, रुंदीकरण करुन स्वच्छतागृहाची सुविधा करण्याबाबत

**(८४) * ४३७११ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकग्राम पुल (ता.कल्याण, जि.ठाणे) हा अत्यंत जुना व जीर्ण अवस्थेत असून सदर पुल केव्हाही कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे तेथील स्थानिक नागरिकांनी सदर बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिकेच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्यामुळे नागरिक उघड्यावर शौचास बसत असल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य असून अत्यंत दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकग्राम पुलाचे नुतनीकरण व रुंदीकरण तसेच लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) लोकग्राम पादचारी पुल १९९१ मध्ये रेल्वेने बांधला आहे, त्याचा खर्च महानगरपालिकेने रेल्वेला दिला आहे.

सदर पुलाची देखभाल रेल्वेमार्फत करण्यात येत असून त्याचा खर्च महानगरपालिका अदा करते.

सदर पुल अरूंद असल्याने वाढत्या प्रवासी संख्येस अपुरा पडतो.

लोकग्राम पादचारी पूल जीर्ण झाल्याबाबत रेल्वे प्रशासनाकडून तसेच स्थानिक नागरिकांकडून या संदर्भात कोणताही पत्र व्यवहार महानगरपालिकेकडे केलेला नाही.

एल्फिस्टन रोड येथील पादचारी पुल दुर्घटनेनंतर या पुलाची विशेष समितीने पाहणी केली असून सदर समितीने प्रस्तुत पुलाचे मजबुतीकरण करून त्यावर छत टाकणेबाबत सुचविले आहे.

(२) लोकग्राम तिकिट घराचे पाठीमागे रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत नाला असून तेथे अस्वच्छता आहे, ही वस्तुस्थिती आहे.

लोकग्राम तिकिट घराजवळ स्वच्छतागृहाची सोय करण्यासाठी तसेच त्याठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनास विनंती केली आहे.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत कल्याण पूर्व भागात स्वच्छतागृह, प्रशस्त पादचारी पुल, वाहनतळ, रिक्षा स्टॅण्ड व बसस्थानक इत्यादीबाबी प्रस्तावित करण्यात आल्या असून, सदर प्रस्तावास रेल्वे प्रशासनाची मंजूरी प्रलंबित आहे.

याच प्रस्तावात लोकग्राम पुलाचे मजबूतीकरणाचा समावेश करण्याची बाब तपासण्याच्या व त्यासह संपूर्ण प्रस्तावास रेल्वे प्रशासनाची मंजूरी घेण्याच्या सूचना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील फुटाळा तलावाची दुरवस्था झाल्याबाबत

**(८५) * ४३३९६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील फुटाळा तलावाचे पाणी विषारी झाले असल्यामुळे पाण्यातील जीवजंतुचा नाश होत असून तलाव साफ करण्यासाठी महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यापैकी कोणीही पुढाकार घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फुटाळा तलावास बुध्दीस्ट थिम पार्क म्हणून विकसित करावयाचे शासनाच्या विचाराधीन असून उक्त ठिकाणी कोटयवधी रूपये खर्च करुन बनविण्यात येणाऱ्या म्युझिकल फाऊंटन प्रकल्पासाठी तेथील माती, घाण, दुर्गंधीयुक्त पाणी बाधक असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कागदपत्रांच्या आधारावर फुटाळा तलावावर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासचा अधिकार नसून तलावाच्या अर्ध्या भागावर सार्वजनिक बांधकाम विभागाची तर अर्ध्या भागावर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची मालकी असल्यामुळे फुटाळा तलावाच्या सफाईची जबाबदारी निश्चित करण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तलावाच्या सफाईची जबाबदारी निश्चित करुन त्वरीत सफाई करण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) गणपती व दुर्गामाता विसर्जन कालावधीत फुटाळा तलावातील पाणी काही प्रमाणात दूषित होते हे खरे आहे.

तथापि, फुटाळा तलावामध्ये दरवर्षी गणपती व दर्गादेवी विसर्जन कालावधीनंतर, नागपूर सुधार प्रन्यासकडून तलावाची साफसफाई केली जाते.

फुटाळा तलाव वस्तीतील मल या तलावात जाऊ नये यासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडून मलवाहिकेचे काम करण्यात येत आहे.

माहे मे, २०१८ व जून, २०१८ या कालावधीत नागपूर महानगरपालिकेकडून फुटाळा तलाव परिसर व तलावाचे साफसफाईचे काम व गाळ काढण्याचे काम करण्यात आलेले आहे.

(२) म्युझिकल फाऊंटन प्रकल्प स्वतंत्रपणे राबविण्यात येत असून, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३), (४) व (५) तलावाच्या अर्ध्या भागावर राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची तर अर्ध्या भागावर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची मालकी आहे हे खरे आहे.

तथापि, नागपूर महानगरपालिकेमार्फत प्रत्येकवर्षी या तलावाची नियमितपणे साफसफाई व स्वच्छता करण्यात येते. तसेच स्वच्छतेकरीता वेळोवेळी लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबविण्यात येते.

याशिवाय या तलावाच्या सौंदर्यीकरणाचे काम नागपूर सुधार प्रन्यासकडून सुरु असून, तलावाच्या दक्षिणेकडील कामे संपलेली असून, उत्तरेकडील भागातील कामे प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## क्रेझी कॅसल, अंबाझरी (जि.नागपूर) येथील व्हेवपूल मध्ये दोन महाविद्यालयीन युवकांचा बुडून मृत्यू झाल्याबाबत

**(८६) * ४३२७२ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रेझी कॅसल, अंबाझरी (जि.नागपूर) येथीज व्हेवपूलमध्ये जलतरण तलावात बुडालेल्या ७ महाविद्यालयीन विद्यार्थी व एक महिला यापैकी ५ जणांचे प्राण वाचविण्यात आले असून २ युवकांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २० मे, २०१८ रोजी दुपारी १ ते १.३० वाजताच्या सुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलतरण तलावात सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात गर्दी होते हे माहित असूनही उक्त ठिकाणी व्यवस्थापनाकडून सुरक्षिततेबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करून क्रेझी कॅसल व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २०/०५/२०१८ रोजी सुमारे १३.३७ ते १३.४२ चे दरम्यान क्रेझी कॅसल, अंबाझरी, नागपूर येथील मनोरंजनाकरीता असलेल्या वेव्ह पुलमध्ये काही युवक हे त्यांच्या मित्रमंडळींसमवेत पाण्यामध्ये उतरले असता त्यातील दोन युवक वेव्ह पुलच्या पाण्यात बुडून मरण पावल्याची घटना निदर्शनास आली आहे.

सदर युवकांना वेव्ह पुलावर नियुक्त जीवरक्षकांनी बाहेर काढून पुढील उपचाराकरीता रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले तर एका युवकास उपचारार्थ दाखल करुन घेतले. याप्रकरणी दिनांक २०/०५/२०१८ रोजी बजाजनगर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू प्रकरण क्रमांक १५/२०१८ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये दाखल आहे.

(२) घटनेवेळी वेव्ह पुलावर पाच जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती तर दोन प्रशिक्षित परिचारीका ठेवण्यात आल्या होत्या. तैनात जीवरक्षकांनी युवकांना पाण्यातून काढण्यास व प्रथमोपचार करण्यास मदत केली आहे. तसेच मृतकांच्या मित्रांनी दोन्ही मृतकांना पोहता येत नसल्याची माहिती जबाबात दिलेली आहे. व्हेव पुलावर घ्यावयाच्या दक्षतेबाबत व्यवस्थापनाने दर्शनी भागात फलक लावलेले असून पोहता न येणाऱ्याकरीता लाईफ जॅकेट उपलब्ध करुन देण्यात येतात. मात्र मृतक व त्यांच्या साथीदारांनी लाईफ जॅकेटची मागणी केलेली नाही असे चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

(३) सदर प्रकरणाच्या चौकशीत अद्यापपावेतो संबंधितांविरुध्द हस्तक्षेपीय गुन्हा नोंदविण्याइतपत पुरावा उपलब्ध झालेला नाही. प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे शहर हद्दीलगतच्या गावांचा महानगरपालिका हद्दीत कचरा टाकण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(८७) * ४२४४४ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या हद्दीलगतच्या गावांमार्फत पुणे महानगरपालिका हद्दीत कचरा टाकण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या गावांमधील कचरा टाकण्याच्या वाढते प्रमाण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हद्दीलगतच्या भागातून महानगरपालिका हद्दीत कचरा टाकण्याचे प्रकार होतात हे खरे आहे.

पुणे महागनरपालिका हद्दीलगतच्या ३४ गावांपैकी ११ गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समावेश करण्यात आला आहे. तेथे घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरू असून संकलीत होणारा कचरा प्रक्रिया करणेसाठी हस्तांतरण केंद्रात देण्यात येतो.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियमातील तरतूदीनुसार महानगरपालिका हद्दीत कचरा टाकण्याऱ्या संबंधितांवर महानगरपालिकातर्फे कारवाई करण्यात येते.

हद्दीबाहेरील लगतच्या २३ गावांच्या हद्दीतून कचरा टाकण्यात येऊ नये यासाठी भरारी पथके, जन जागृती अशा उपाययोजनेंव्दारे कचरा टाकण्याच्या प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्यात येतो.

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेरील लगतच्या २३ गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा नसल्याने संबंधित ग्रामपंचायतींमध्ये तसेच राज्यातील अन्य महानगरपालिका लगतच्या गावांमध्ये प्रभावी घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रिया यंत्रणा उभारण्याबाबत ग्रामविकास विभागास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुंबई व उपनगरात पावसाळयापूर्वी भूमिगत सुविधा करण्याकरीता खोदण्यात आलेल्या पदपथांची दुरुस्ती करण्याबाबत

**(८८) * ४१८५० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात पावसाळयापूर्वी भूमिगत सुविधा करण्याकरीता खोदण्यात आलेल्या पदपथांची दुरुस्ती योग्य प्रकारे होत नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परळ (मुंबई) येथेही दुरुस्ती योग्य प्रकारे न झाल्याने गतिरोधक निर्माण झाला असून पावसाळयात पाणी साचल्यावर नागरिकांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई व उपनगरात पावसाळ्यापूर्वी भूमिगत सुविधा करण्यासाठी खोदण्याची परवानगी दिनांक १५ मे, २०१८ पर्यंत देण्यात आली होती. तसेच सदर खोदण्यात आलेल्या पदपथाची दुरुस्ती करण्यासाठी सर्व कंत्राटदारांना दिनांक ३० मे, २०१८ पर्यंत वेळ देण्यात आली होती. त्यानुसार सर्व पदपथांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) परळ, मुंबई येथील पदपथाची दुरुस्ती योग्य प्रकारे करण्यात आली असून त्यामुळे पाणी साचत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

परळ मधील हिंदमाता परिसरातील सखल भागात जास्त प्रमाणात पाऊस पडल्यानंतर साचलेल्या पाण्याचा निचरा जलदगतीने होण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बी.जे.देवरुखकर मार्ग ते मडकेबुवा चौकापर्यंत एकूण ८०० मी. लांबीच्या भूमिगत पर्जन्य जलवाहिनीचे काम हाती घेण्यात आले आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा वगळून १८ महिने इतका असून, सदर कामाचा कार्यादेश दिनांक १८/१२/२०१७ रोजी देण्यात आला आहे. सदर ८०० मी. लांबीच्या भूमिगत पर्जन्य जलवाहिनीपैकी २२५ मी. इतक्या लांबीच्या पर्जन्य जलवाहिनीच्या आवधनाचे काम माहे फेब्रुवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आले आहे. या कालावधीमध्ये सदर पदपथाचे खोदकाम करण्यात आल्याने नागरिकांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला ही वस्तुस्थिती आहे.

सदर पर्जन्य जलवाहिनीचे उर्वरित काम पावसाळयानंतर सुरु करण्यात येणार असून, महानगरपालिकेमार्फत संपूर्ण पदपथाचे किरकोळ दुरुस्तीसह मानकानुसार कायमस्वरुपी पुन:स्थापन करण्यात येणार आहे.

-----------------

## राज्यात तसेच मुंबईत फेरीवाले धोरण राबविण्याबाबत

**(८९) * ४१९९६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमरिशभाई पटेल : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३२८३१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने रेल्वे स्थानक व गर्दीच्या परिसरातील फेरीवाले हटवण्यासाठी मोहिम सुरु केल्यामुळे काही महिने स्थानकाबाहेरचा परिसर फेरीवालामुक्त झाला असून पाच महिन्यांनंतर पुन्हा दादर, विलेपार्ले, कुर्ला, गोरगांव, बोरिवली, सीएसटी परिसरात फेरीवाल्यांनी पुन्हा बस्तान बसविल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात तसेच मुंबईत फेरीवाले धोरण आखण्यात येणार असल्याचे शासनाने जाहिर केले असूनही त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर फेरीवाले धोरण केव्हापर्यंत राबविण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) "फेरीवाल्यांचे पुन्हा बस्तान" अशा आशयाची बातमी दिनांक १६/०३/२०१८ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्व रेल्वे स्थानकांपासून १५० मीटर अंतरापर्यंत "ना-फेरीवाला क्षेत्र" असे फलक लावण्यात आले आहेत.

तथापि, काही प्रमाणात फेरीवाल्यांचा या परिसरात वावर असतो. यास्तव महानगरपालिकेच्या २४ विभागात दोन सत्रामध्ये फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियम) (महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी योजना प्रसिध्द केली आहे. यानुषंगाने फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, रेल्वे स्थानकाबाहेर १५० मीटरच्या अंतरापर्यंत पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याबाबत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत

**(९०) * ४३६९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २००० कंत्राटी सफाई कामगारांना सर्वोच्च न्यायालयाने आदेश देवूनही सेवेत कायम करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत कामगारांनी दिनांक २४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयावर धडक मोर्चा आणला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या कामगार मंत्र्यांना दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी मा.राज्यपालांनी कंत्राटी कामगारांना किमान वेतन देण्याबाबत आदेश देवूनही आजमितीस त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत कायम करण्याच्यादृष्टीने तसेच किमान वेतनासह थकबाकी विना विलंब लागू करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई कंत्राटी संघटनेच्यावतीने सुमारे ५०० ते ६०० कामगार २० ते २५ च्या गटाने मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळ दिनांक २४/०५/२०१८ रोजी निवेदन देण्याकरीता आले होते ही वस्तुस्थिती आहे.

मा.न्यायालयाच्या आदेशात नमूद असणाऱ्या १६०० कामगारांच्या यादीतील ३०९ सफाई कामगारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी बैठक घेऊन खालीलप्रमाणे निदेश दिलेले आहेत :-

- सदर कामगारांना मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नियमित करण्याची कार्यवाही करुन दिनांक १३/१०/२०१४ पासून देय असणारे आर्थिक लाभ ३ महिन्यात अदा करण्यात यावेत.

- मा.न्यायालयाच्या यादीतील कामगारांच्या नावाचे इंग्रजी स्पेलिंग व कामगारांनी सादर केलेल्या कागदपत्रातील नावाचे इंग्रजी स्पेलिंग यात तफावत असणाऱ्या कामगारांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन नियुक्ती आदेश देण्यात यावेत.
- या कारणासाठी ज्या कामगारांची नियुक्ती आदेश रद्द करण्यात आले आहेत त्या कामगारांना क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही प्राधान्याने करण्यात यावी.

-----------------

## कल्याण पूर्व (जि.ठाणे) परिसरातील गुन्हेगारी व अंमली पदार्थांच्या व्यवसायावर पोलीस विभागाकडून कारवाई होत नसल्याबाबत

**(९१) * ४१६८५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पूर्व (जि.ठाणे) परिसरात सोनसाखळी चोरी, घरफोडी त्याचप्रमाणे किरकोळ वादातून चाकू, सुरे काढण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल जात असून सदर परिसरात अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात होत असलेली विक्री व त्याचे सेवन यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर पोलिसांचे नियंत्रण राहिले नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरल्याबाबतचे सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस आयुक्त, ठाणे यांना दिनांक १० जानेवारी, २०१८ व दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनात कल्याण पूर्व परिसरात कोणकोणत्या ठिकाणी अंमली पदार्थांची विक्री व सेवन केले जाते त्या ठिकाणांची स्पष्ट माहिती देण्यात आली असून उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने अंमली पदार्थांचे अड्डे मोडून काढण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदरहू प्रकरणी परिमंडळांतर्गत कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थाची विक्री संदर्भात गुन्हे दाखल नसून वाहतुक करणारे गुन्हेगार संदर्भात १ गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात १२ किलो १५० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून ४ आरोपींवर दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केले आहे. तसेच, अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुध्द ७ गुन्हे दाखल असून ७ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. अंमली पदार्थाचे अड्डे मोडून काढण्यासाठी परीसरात गस्त नेमण्याकरीता, पोलीस अधिकारी/पोलीस कर्मचारी यांचे पथक स्थापन करण्यात आले असून योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वातंत्र सैनिकांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(९२) * ४३४३२ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वातंत्र सैनिकांना सध्या मिळत असलेले मानधन अत्यल्प असल्याने स्वत:चा, कुटूंबाचा तसेच औषधाचा खर्चही भागत नसून त्यांची उपासमारी होत असल्यामुळे त्यांचे मानधन रुपये २०००/- करण्याकरीता वारंवार मागणी करण्यात येऊनही स्वातंत्र सैनिकांच्या मानधनात वाढ करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वातंत्र्य सैनिकाचे मानधन रुपये २०००/- करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सध्या राज्य शासनाकडून राज्याच्या स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन (मानधन) धारकांना दिनांक ०२/१०/२०१४ पासून दरमहा रुपये १०,०००/- इतके निवृत्तीवेतन अदा केले जाते. तर केंद्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक पेन्शनधारकांना केंद्र शासनाची रुपये २६,०००/- तसेच राज्याची अतिरिक्त रुपये ५००/- एवढी पेन्शन देण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे महानगरपालिकेमार्फत आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(९३) * ४२३२१ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात महानगरपालिकेमार्फत आयुर्वेदिक उपचार पध्दतीने उपचार करण्याकरीता आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव गत आठ वर्षापासून आरोग्य लेखापालांच्या शेऱ्यामुळे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील प्रत्येक प्रभागात प्रत्येकी एक या प्रमाणे २४ आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच उक्त आयुर्वेदिक रुग्णालय त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरात महापालिकेमार्फत आयुर्वेदिक रुग्णालय सुरु करण्याच्या प्रस्तावावर उपप्रमुख लेखापाल (आरोग्य) यांनी उपस्थित केलेल्या रुग्णालयाच्या बांधकामाकरीता जागेची उपलब्धता, रुग्णालय चालविणारे कर्मचारी वर्ग व अनुषंगिक सोयी-सुविधा इत्यादी मुद्दयांबाबतची पुर्तता होऊ न शकल्यामुळे प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभागांमध्ये २४ आयुर्वेदिक रुग्णालये सुरु करण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बा.य.ल. नायर धर्मादाय रुग्णालय व रा.ए.स्मा. रुग्णालयामध्ये आयुर्वेदीक बाह्यरुग्ण विभाग व अनुक्रमे ५ व १० रुग्णशय्यांचा आंतररुग्ण विभाग कार्यरत असून महानगरपालिका मुख्यालय, एलफिन्स्टन रोड, प्रभादेवी आणि अंधेरी या चार ठिकाणी आयुर्वेदीक दवाखाने चालविण्यात येतात.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आयुर्वेदीक रुग्णालय नव्याने सुरु करण्याची आवश्यकता तपासून याबाबतचा निर्णय महानगरपालिकेने त्यांच्यास्तरावर घ्यावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबई येथील गोरेगाव, पत्राचाळ, सिध्दार्थ नगर पुनर्विकास प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९४) * ४१६६२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील गोरेगाव, सिध्दार्थ नगर, पत्राचाळ पुनर्विकास गत दहा वर्षापासुन वादात अडकलेला असून विकासक गुरु आषिश कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने रुपये १०३४ कोटीचा गैरव्यवहार केल्याचे म्हाडाच्या चौकशीत निष्पन्न झाल्याचे दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुरु आषिश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे तसेच रुपये १०३४ कोटीची रक्कम वसुल करण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

म्हाडाच्या अहवालानुसार, गोरेगाव सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्था पत्राचाळ यांचे पुनर्विकास प्रकल्पात विकासक मे.गुरु आशिष कन्सट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने विक्री हिश्श्यातील बांधकाम क्षेत्रफळाची परस्पर त्रयस्थ विकासकांना विक्री करुन गैररित्या रुपये १०९५ कोटींची रक्कम प्राप्त केल्याचे निदर्शनास आले.
(२) सदर प्रकरणी विकासक मे.गुरु आशिष कन्सट्रक्शन प्रा.लि. यांचे संचालक व इतर यांचेविरुध्द आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे दिनांक १३/०३/२०१८ रोजी गुन्हा क्रमांक ८५/२०१८ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत

**(९५) * ४२५७१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बांधकाम कामगारांसाठी कल्याण योजना राबविण्याकरीता विविध वस्तूंवरील अधिभाराच्या रुपाने केंद्र शासनाकडे जमा झालेले सुमारे २८ हजार कोटी रुपये विविध राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही कायदयाच्या अंमलबजावणीच्या कारणास्तव विनावापर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडे जमा झालेल्या ५ हजार कोटी रुपयांपैकी शासनाने फक्त २५५ कोटी रुपये खर्च केले असून केंद्र व राज्य शासनाच्या अनास्थेमुळे सदर रक्कम विविध योजनांकरीता तसेच कामगारांच्या

कल्याणकारी योजनेकरीता वापरण्यात आले नसून सदर प्रकरणी जबाबदार उच्च पदस्थ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने ही शासनाला याबाबत वारंवार निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकराच्या माध्यमातून माहे मार्च, २०१८ पर्यंत रुपये ६२४४.२३ कोटी एवढा निधी जमा झालेला आहे. सदर उपकराच्या निधीतून बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

(२) जमा उपकर निधीमधून माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत २८ कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना रुपये २२७.६२ कोटी इतक्या लाभाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच प्रशासकीय खर्चावर रक्कम रूपये १०२.८४ कोटी इतका खर्च मिळून एकूण रुपये ३३०.४६ कोटी एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

शासन अधिसूचना दिनांक ०४/०८/२००७ अन्वये कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय प्रतिनिधी असलेले मंडळ स्थापन करण्यात आले. तसेच, शासन अधिसूचना दिनांक ०१/०५/२०११ नुसार स्वयंपूर्ण त्रिपक्षीय मंडळ स्थापन करण्यात आले आणि वेळोवेळी पुनर्रचना करण्यात आली आहे. आता मंडळाचे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयातील उपलब्ध असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत सुरु आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९/०३/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार केंद्र शासन व राज्य शासनाने करावयाच्या कार्यवाहीबाबत Special Direction व General Direction देण्यात आलेले आहेत. त्यानुसार बांधकाम कामगारांची नोंदणी, आस्थापना नोंदणी, उपकर जमा करणे, कल्याणकारी योजनांचे मॉडेल तयार करणे व सोशल ऑडीट करणे या

मुद्यांवर विचारविनिमय करणे व निर्णय घेण्यासाठी केंद्र शासनाने सह सचिव व संचालक (कामगार कल्याण), केंद्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार मंडळाने केलेली कार्यवाही व मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात आला आहे. समितीचा अहवाल अंतिम झाल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. सदर अहवालास अनुसरून केंद्र शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार मंडळ स्तरावरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक २३/०२/२०१८ ते दिनांक १०/०४/२०१८ या कालावधीत विशेष नोंदणी अभियान राबवून २,२४,५७७ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी केलेली आहे. मंडळाकडे जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी व्हावी या उद्देशाने बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारे माहिती तंत्रज्ञानावर आधारीत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणे व जिल्हास्तरावर ४० सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) शहरात घनकचऱ्याचे ढिगारे साचल्यामुळे सर्वत्र अस्वच्छता पसरल्याबाबत

**(९६) * ४३४६३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) शहरात अनेक दिवसापासून घनकचऱ्याचे ढिगारे साचले असून सर्वत्र अस्वच्छता पसरली असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हदगाव शहरातील घन कचऱ्याचा प्रश्न सोडविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हदगाव नगरपरिषदेमार्फत घनकचरा व्यवस्थापनाचे काम खंडोबा मजूर सहकारी संस्थेस देण्यात आले आहे.

- सदर संस्था नियमितपणे कचरा उचलण्याचे काम करीत आहे.
- नगरपरिषदेमार्फत संस्थेच्या कामावर नियमित देखरेख ठेवण्यात येते.
- घनकचरा व्यवस्थापनाबाबत प्राप्त तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यात येऊन दरमहा नियमित फवारणी सुध्दा करण्यात येते, असे मुख्याधिकारी, हदगांव नगरपरिषद यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(२) तथापि, सदर प्रकरणी वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(९७) * ४३५५८ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९५१ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहरातील अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्याचे सिमेंट-डांबरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असून रस्त्यावर खड्डे पडून सदर रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त ठिकाणी मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्यांचे दुरूस्ती, देखभाल व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी रस्त्याचा २.५ कि.मी. भाग अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत येतो. सदर रस्ता अंबरनाथ नगरपरिषदेने ८०% सिमेंटद्वारे व उर्वरित २०% भाग डांबरीकरणाद्वारे पूर्ण केला आहे.

आवश्यक त्याठिकाणी डांबरीकरण झाल्याने सद्य:स्थितीत रस्त्यावर खड्डे नसल्याचे तसेच सदर रस्ता वाहतूक योग्य असून वाहतूक सुरळीत होत असल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.